दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३६१ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.१७ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

## राज ठाकरे यांचा महायुती सरकारला इशारा

# निवडणुकीच्या तोंडावर टोलमाफी करायची अन् नंतर मागे घ्यायची असे चालणार नाही


**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी मुंबईतील पाचही एन्ट्री पॉईंटवरील टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना टोलमाफी देण्याच्या निर्णयाचे स्वागत केले. पण त्याचवेळी त्यांनी सरकारला निवडणुकीनंतर हा निर्णय रद्दबातल केल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशाराही दिला. सरकारचा टोलमाफी देण्याचा निर्णय स्वागतारार्ह आहे. पण सरकारने निवडणुकीनंतर हा निर्णय रद्द करण्याचा प्रयत्न करू नये. असे होणार नाही आणि मनसे तसे होऊही देणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

राज ठाकरे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेला संबोधित केले. त्यात त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने मुंबईतील पाचही एन्ट्री पॉईंटरवरील टोलनाक्यांवर हलक्या वाहनांना दिलेल्या टोलमाफीच्या सवलतीचे स्वागत केले. ते म्हणाले, राज्यात मनसेनेच सर्वप्रथम टोलमाफीची मागणी केली होती. या प्रकरणी जनतेची कशी फसवणूक होत आहे? हे आम्ही लोकांना पटवून दिले. यासाठी सातत्याने भूमिका मांडली. त्यानंतर आता मुंबईतील पाचही एन्ट्री पॉईंटवर टोलमाफी जाहीर झाली आहे. याविषयी मी सरकारचे अभिनंदन करतो व आभार मानतो. सरकारला उशिरा का होईना या गोष्टी समजल्या.सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर टोलमाफी देण्याचा निर्णय घेतला. निवडणुकीच्या तोंडावर टोलमाफी करायची आणि निवडणूक संपली की पुन्हा हा निर्णय मागे घ्यायचा असे चालणार नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेना असे होऊ देणार नाही. आम्ही ते खपवूनही घेणार नाही. त्यामुळे सरकारने अशी फसवणूक करण्याचा प्रयत्न करू नये. कारण यापूर्वी काही प्रकरणांत कायदेशीर गोष्टींचा दाखला देत अशा गोष्टी पुन्हा सुरू करण्यात आल्या होत्या.राज ठाकरे म्हणाले, सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे जनतेला समाधान आहे. आतापर्यंत किती पैसे येतात? किती जातात? हे कळायला काहीच मार्ग नव्हता. टोलनाक्याचा सर्व व्यवहार कॅशवर होता. त्यामुळे किती गाड्या गेल्या? कुणाच्या खिशात किती पैसे गेले? कुणाला किती पैसे मिळाले? हे कुणालाही समजत नव्हते. राजकीय पक्षही यावर गप्प होते. आता श्रेय घेण्यासाठी अनेकजण पुढे येतील. पण त्यांचा याच्याशी कोणताही संबंध नाही. हे आंदोलन कुणी केले? हे जगाला माहिती आहे. राज ठाकरेंनी एखादे आंदोलन हाती घेतले की काय होते हे या निर्णयातून स्पष्ट होते. सरकारला टोलमाफी द्यावी लागली आहे.राज ठाकरेंनी यावेळी लाडकी बहीण योजनेवरही टीका केली. ते म्हणाले, असे पैसे वाटून काहीच होणार नाही. आज तुम्ही जनतेला हजारो रुपये वाटत आहात. तुम्ही असे करूच शकत नाही. हे पैसे तुमच्या घरचे आहेत का? सरकारच्या तिजोरीत पैसे नाहीत आणि तुम्ही पैसे वाटत सुटले आहात. यापुढे तुम्हाला असे पैसे वाटता येणार नाहीत. अशाने राज्य कंगाल होऊन जाईल.विधानसभा निवडणुकीत राज्यात सर्वात जास्त जागांवर निवडून लढवेल, अशी घोषणाही राज ठाकरे यांनी यावेळी केली. आम्ही ही निवडणूक केवळ लढवायची म्हणून लढवत नाही. आम्हाला निवडणूक कशी लढवायची हे ठावूक आहे. आम्ही यापूर्वीही अशा निवडणुका लढवल्या आहेत. याविषयी आमचे दौरे लवकरच राज्यात सुरू होतील. या विधानसभेच्या निवडणुकीनंतर मनसे सत्तेत असेल. मनसे आपला जाहीरनामा लवकरच जाहीर करेल, असे राज ठाकरे म्हणाले.



## माल तोच पॅकिंग मात्र वेगवेगळे अशी राजकीय पक्षांची परिस्थिती:राजू शेट्टी

**सातारा (वृत्तसंस्था)**–स्वाभिमानी शेतकरी संघटना, प्रहार संघटना व कोल्हापूरचे संभाजीराजे छत्रपती यांनी एकत्र येत परिवर्तन महाशक्ती आघाडी स्थापन केली असून राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या विरोधात विधानसभा निवडणुकीमध्ये रणशिंग फुंकले आहे. सर्वसामान्यांच्या विकासाचे प्रश्न घेऊन आणि शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव हे जिव्हाळ्याचे प्रश्न घेऊन सातारा जिल्ह्यात ही तिसरी आघाडी सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार उभे करणार आहे, अशी माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी साताऱ्यात पत्रकार परिषदेत दिली आहे. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, महाराष्ट्रातील २२५ घराणी आणि त्या घराण्यातील सदस्य आलटून- पालटून सातत्याने राज्याच्या सत्तेत येत राहतात. या महायुती आणि महाविकास आघाडी शासनामध्ये माल तोच पॅकिंग मात्र वेगवेगळे.. अशी परिस्थिती आहे. या दोन्ही आघाड्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले आहे. सर्वसामान्य जनतेला सक्षम



तिसरा पर्याय देण्याकरता चळवळीतले आम्ही नेते वामनराव चटप, शंकरराव धोंडगे, संभाजीराजे छत्रपती, प्रहार संघटनेचे बच्चू कडू आणि स्वाभिमानी शेतकरी संघटना एकत्र आली असून त्यांच्या कोअर कमिटीची बैठक गुरुवारी पुणे येथे होत आहे. या बैठकीत महाराष्ट्रात ज्या ठिकाणी सक्षम आणि स्वच्छ चेहऱ्याचा उमेदवार मिळेल अशा जागा आपण तिसरी आघाडी म्हणून लढवणार असल्याचे सूतोवाच राजू शेट्टी यांनी केले. सातारा जिल्ह्यामध्ये कराड दक्षिण, कराड उत्तर, सातारा, माण, कोरेगाव व वाई या सहा विधानसभा मतदारसंघात स्वाभिमानी शेतकरी संघटना व कोअर कमिटी चर्चा करून उमेदवार देणार आहे. हे उमेदवार सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न घेऊन जनतेच्या समोर जाणार आहोत, असे सांगून महाराष्ट्रामध्ये सर्वसामान्यांचे थडगे बांधून विकास करणार आहात का? असा स्पष्ट सवाल राजू शेट्टी यांनी केला.महाविकास आघाडीने भूमी अधिग्रहण अथवा एफआरपी या संदर्भात चुकीचे निर्णय घेतले तसेच महायुतीसुद्धा 'लाडकी बहीण योजने'च्या माध्यमातून लाखो रुपयांची उधळपट्टी करत आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये जनतेशी काहीही घेणे- देणे नसलेले प्रतिनिधी आहेत. एकीकडे पैशाची लयलूट सुरू असताना दुसरीकडे ३३०० कोटी रुपये मुलांच्या शिष्यवृत्तीचे प्रलंबित आहेत, त्यामुळे असले सरकार काय कामाचे? असा प्रश्नही राजू शेट्टी यांनी विचारला.


### महाविकास आघाडीच गुजरातची ब्रँड म्बेसेडर

## ज्यांचा गृहमंत्रीच तुरुंगात गेला,तेच आता आरोप करताहेत-देवेंद्र फडणवीसांचा पलटवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महाविकास आघाडीतील नेते गुजरात राज्याचे ब्रँड म्बेसेडर असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. सध्या देशात महाराष्ट्र नंबर एकचे राज्य असून देखील महाविकास आघाडीचे नेते गुजरातचे गुणगान गात आहेत. या माध्यमातून ते महाराष्ट्राला कमी लेखत असल्याचा आरोप त्यांनी केला. इतकेच नाही तर गृहमंत्रालयावर होत असलेल्या आरोपांवर देखील त्यांनी प्रत्युत्तर दिले आहे. ज्यांचा गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेला, तेच आता आरोप करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

राज्यातील स्थगिती सरकार गेल्यानंतर आता राज्यात गतिशील सरकार आले असल्याचा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. आमच्यासाठी निवडणुकीचा शंखानाद झाला आहे. मात्र विरोधकांसाठी ते ऐलान असल्याचा टोला देखील फडणवीस यांनी लगावला आहे. आम्ही परिवर्तन करणाऱ्या योजना आणल्या असल्याचा दावा देखील



फडणवीस यांनी केला आहे.

शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेची योजना आणणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना ३६५ दिवस दिवसा वीज उपलब्ध करून देणार असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. ही केवळ घोषणा नाही. तर याचे प्रत्यक्ष काम जमिनीवर सुरू केले असल्याचे देखील ते म्हणाले. साडेआठ रुपयांना पडणारी वीज आता तीन रुपयाला पडणार असल्याचे देखील फडणवीस यांनी म्हटले आहे. यातून राज्य सरकारचा मोठ्या प्रमाणात पैसा देखील वाचणार असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे.

राज्यातील कायदा व्यवस्थे संदर्भात देखील गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. राज्य सरकारने कोणतेही घटना घडल्यानंतर तात्काळ कारवाई केली असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. मात्र, ज्यांचे गृहमंत्री स्वतः जेलमध्ये गेले. ते आता राज्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेवर बोलत असल्याचा खोचक टोला देखील त्यांनी लगावला. यावेळी त्यांनी राज्यात महाविकास आघाडी सरकारच्या म्हणजेच उद्धव ठाकरे सरकारच्या काळात घडलेल्या अनेक गुन्हेगारी संदर्भातील घटनांचा उल्लेख केला. आता देखील काही घटना घडल्या आहेत. मात्र तात्काळ कारवाई केली गेली असल्याचा दावा त्यांनी केला.

## मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी मतमोजणी करावी:ईव्हीएमवरील आरोप टाळण्यासाठी वंचितचा निवडणूक आयोगाला सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. मात्र ही मतमोजणी मतदानाच्या दुसऱ्याच दिवशी करण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. यासंदर्भात निवडणूक आयोगाला लेखी निवेदन देखील देणार असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. ते आज सकाळी मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, महाराष्ट्र हे शांतताप्रिय राज्य असल्याचे निवडणूक आयोगाने मान्य केले आहे. त्यामुळे त्यांनी एका टप्प्यात निवडणुका घेण्याचा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाचा हा निर्णय चांगला असून सर्वच राज्यांमध्ये अशाप्रकारचा निर्णय घ्यायला हवा. मात्र निवडणुकीच्या दुसऱ्या दिवशी लगेच मतमोजणी व्हावी, अशी आमची मागणी आहे. निवडणूक आयोगाने या मागणीवर विचार करावा. यापूर्वी बॅलेट पेपरद्वारे मतदान व्हायचे तेव्हा दुसऱ्याच दिवशी मतमोजणी केली जायची. मला वाटते की, ईव्हीएम हे मशीन आहे त्यामुळे लगेच मतमोजणी करता येते. दुसऱ्या दिवशी मतमोजणी झाल्यास हरियाणा निवडणुकीवेळी झालेले आरोप पुन्हा होणार नाहीत. याबाबत निवडणूक आयोगाला आम्ही लेखी पत्र देखील पाठवणार आहोत, असेही प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले.क्रिमीलेयर जीआरवर बोलताना आंबेडकर म्हणाले, सुप्रीम कोर्टाने वर्गीकरण आणि क्रिमीलेयर बाबत जो निर्णय घेतला होता, तो काय होता? त्यावर पॉलिसी बनू शकते की, संसद यावर केवळ निर्णय घेऊ शकते. तर यावर फक्त संसदच निर्णय घेईल आणि हा मुद्दा कोर्टात आहे. मात्र त्याआधीच या राज्य सरकारनेच त्याची अंमलबजावणी सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि जीआरही जारी केला, हे कायदेशीरदृष्ट्या योग्य नाही, असे प्रकाश आंबेडकर म्हणाले.प्रकाश आंबेडकर आंबेडकर म्हणाले, ओबीसी समाज भाजपला मतदान करेल, असे मला वाटत नाही. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावेळीही आमच्या पक्षाने भूमिका जाहीर केली होती. आम्ही ओबीसींच्या समर्थनासाठी पुढे आलो होतो आणि आरक्षण बचावासाठी उभे राहिले होतो. त्यामुळे भाजपने कितीही प्रयत्न केला तरी ओबीसी समाज त्यांना मतदान करणार नाही, असा विश्वास प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केला.

## महिला आयोगाच्या अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा रूपाली चाकणकर यांच्यावर

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महिला आणि बालविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा कार्यकाळ हा तीन वर्षांचा असतो. सध्या या आयोगाची जबाबदारी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या रूपाली चाकणकर यांच्यावर आहे. येत्या २२ तारखेला चाकणकर यांचा कार्यकाळ संपणार होता. मात्र, पूर्वीच आयोगाच्या अध्यक्षपदाची धुरा पुन्हा एकदा त्यांच्याकडेच सोपवण्यात आली आहे. या संदर्भात नुकतेच गॅजेट प्रसिद्ध करण्यात आले आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच महायुतीच्या वतीने राज्यपाल नियुक्त १२ आमदारांपैकी सात आमदारांचा शपथविधी काल पार पडला. त्यातच राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांना देखील विधान परिषदेची आमदारकी मिळणार? अशी चर्चा होती. मात्र, त्यांच्या नावाला पक्षातीलच महिला नेत्यांनी विरोध केला होता. त्यामुळे ऐनवेळी त्यांचे नाव या यादीतून वगळण्यात आल्याचे बोलले जात होते. मात्र, आता त्यांना पुन्हा एकदा महिला आयोगाच्या अध्यक्षपदी कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे आता हे पद पुढील तीन वर्षे देखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे राहणार आहे.

# मी स्वत:मराठा समाजाला आरक्षण देणार:मराठा आरक्षणावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची स्पष्टोक्ती



**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यातील मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरुन मनोज जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या भूमिकेवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रतिक्रिया दिली असून मराठा समाजाला आम्ही अन् मी स्वत: आरक्षण देणार आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता हे आरक्षण देणार, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. महायुतीच्या वतीने बुधवारी संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही जे बोलतो ते करतो. मी स्वत: ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा समाजाला आरक्षण देणार आहे. दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला वंदन करुन मराठा समाजाला आरक्षण देण्याची शपथ घेतली. त्यानंतर विधानसभेचे अधिवेशन बोलावून मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले होते. यापूर्वीही देवेंद्र फडणवीस यांनी देखील आरक्षण दिले होते, पण ते आरक्षण कुणी घालवले, त्यांना आरक्षण कोर्टात टिकवता आले नाही. आता देखील आम्ही दिलेले आरक्षण रद्द करण्यासाठी याचिका दाखल होत आहेत. याचिका दाखल करणारे कोण आहेत, ते एकदा पहा, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवरही निशाणा साधला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. पण महायुतीने मराठा समाजाला काय दिले, याबाबतही जरांगे यांनी विचार करावा. महायुतीने सारथी, अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ तसेच ओबीसी समाजाप्रमाणे मराठ्यांना सवलती दिल्या आहेत. आधी ज्यांच्या हातात सत्ता होती, त्यांनी कधीही मराठा समाजाला आरक्षण दिले नाही. फक्त मतांसाठी मराठा समाजाचा वापर केला, त्यामुळे मराठा समाजाला कोणी दिले आणि कोणी वंचित ठेवले, याचा जरांगे यांनी विचार करावा, असेही शिंदे म्हणाले.महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनला प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. सर्व लाडक्या बहीणी सरकारच्या पाठिशी आहेत. ही योजना गेम चेंजर झाली आहे. परंतु विरोधक ही योजना बंद करण्यासाठी कोर्टात गेले आहेत. महाविकास आघाडी आमच्या सर्व योजना बंद करण्याची भाषा करीत आहे. परंतु, लाडकी बहीण योजनेला हात लावला तर याद राखात्यांचा करेक्ट कार्यक्रम होईल. आमच्या लाडक्या बहिणी त्यांचा करेक्ट कार्यक्रम करणार आहे, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर केली आहे.दरम्यान, मराठ्यांना फक्त शिंदे साहेब आरक्षण देऊ शकतात. मराठ्यांना आरक्षण देणारा तेवढाच धाडसी माणूस आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. महायुतीच्या पत्रकार परिषदेनंतर मनोज जरांगे यांनी जालन्यात पत्रकार परिषद घेत हे विधान केले आहे.

# परतीचा पाऊस आणि शेतातील सोयाबीन

**परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन ओलेचिंब भिजले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. ऐनवेळी आलेल्या या नैसर्गिक आपत्तीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. निवडणुका जिंकण्यासाठी विविध लोभस व लाडक्या योजना सुरू करणाऱ्या सरकारने सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा का देऊ नये? यावेळी सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे.**

अखेर आचारसंहिता घोषित झाली. जवळपास सगळ्याच राजकीय पक्षांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे. मागील अनेक महिन्यांपासून निवडणुकांची वाट पाहणारी विविध क्षेत्रातील मंडळी विशेषतः राजकीय कार्यकर्ते कमालीचे क्टिव्ह झाले. सगळ्यांमध्ये चैतन्य सळसळले. जवळपास सर्वांनीच विधानसभा निवडणुकांचे प्लॅनिंग व आराखडे आधीच बनवले आहे. केवळ वाट होती ती आचारसंहिता घोषित होण्याची. या निवडणुकीत उभे राहू इच्छिणारे संभावित उमेदवार सगळे आजपासून कामाला लागणार आहे. आचारसंहिता घोषित झाली. पुढील राजनीतीला गती येणार आहे.

या सर्व भावगर्दीमध्ये मात्र शेतकऱ्यांच्या व्यथांकडे कोणाचेही लक्ष नाही. सारे लक्ष राजकारणाकडे आहे. लोकप्रियतेसाठी सरकारने वेगवेगळ्या गोंडस आणि आकर्षक योजना घोषित करून मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्याचा सपाटा लावला. वानावानाच्या नवनवीन योजना आणून शासनाने आपण कसे कैवारी व लोकांचे हितचिंतक आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न केला असला तरी त्या योजनांना राजकीय वास येत आहे हेही तितकेच खरे आहे. शासनाने मतदारांना कितीही लुभावण्या योजना आणल्या तरी मतदार एवढा जागरूक आहे की त्याला आपलं हित आणि अहित बरोबर कळते. ऐन निवडणुकीच्या तोंडावर दिलेलं दान समजू शकणार नाही एवढा मतदार दूधखुळा नक्कीच नाही. फक्त तो बोलून दाखवत नाही. शांत असतो आणि योग्य वेळी आपला कौल देतो.

शेतकरी परतीच्या पावसामुळे बेजार झाला आहे. या परतीच्या पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील सोयाबीन सडवून टाकले असून अनेक कास्तकार त्यामुळे परेशान आहे. वर्षभर काबाडकष्ट करून शेती पिकविण्याचे स्वप्न पहात मुलाबाळांच्या मुखात सुखाने अन्नाचे दोन घास जावे यासाठी अहोरात्र झटणाऱ्या बापाच्या डोळ्यात या परतीच्या पावसाने अश्रू उभे केले आहे. निसर्गाकडून तोंडचा घास हिसकावून घेतला जात आहे.मायबाप सरकार निदान आपल्या या सोयाबीनला व्यवस्थित भाव देईल व आपली दिवाळी साजरी होईल असे स्वप्न कास्तकार बघत असताना सरकार मात्र उत्पन्नावर आधारित भाव द्यायला तयार नाही. एकीकडे लोक कल्याणाचा आव आणायचा आणि दुसरीकडे सामान्य शेतकऱ्यांच्या एका छोट्याशा मागणीकडे दुर्लक्ष करायचे हा दुजाभाव नाही का.

ज्याप्रमाणे इतर क्षेत्रातील नागरिकांना जीवन जगण्याचा अधिकार आहे. तसा शेतकऱ्यांनाही आहे. शेतकरी हे माणसं नाहीत का? शेतकरी हे मतदार नाही का? शेतकऱ्यांना मालाला भाव का मिळत नाही? असे अनेक प्रश्न या निमित्ताने विचारावेसे वाटतात. दुर्दैवाने शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला कुठल्याही नेत्यांना वेळ नाही.




जो तो आता पुढे आचारसंहितेच्या काळात आपलाच साहेब कसा निवडून येईल याकडे लक्ष ठेवून आहे.आता जाहीर सभा, जाहीर भाषणातून सामान्य नागरिकांसमोर मोठ्या आत्मविश्वासाने फोकणाड्या ताणल्या जाणार आहे. सामान्य मतदारांना ते खरे सगळं सांगत आहे असे समजून ऐकावं लागणार आहे. शासनाला समाजातील इतर घटकांकडे लक्ष द्यायला वेळ आहे. इतरांच्या समस्या शासनाच्या कानावर बरोबर जातात. मग शेतकऱ्यांच्या समस्या का जात नाही.

शेतकऱ्यांचे दुखणं सरकार समजून का घेत नाही हा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरती मत मागायची आणि जेव्हा शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याची वेळ येते तेव्हा पद्धतशीरपणे बहिरेपणाचे सोंग घ्यायचं.ही पूर्वीपासून शासनाची चाललेली रीत आहे.

सरकार कोणतही असो ते शेतकऱ्यांच्या समस्या जेव्हा जेव्हा निर्माण होतात तेव्हा तेव्हा ते बहिर होत असत. खरं म्हणजे आता या परतीच्या पावसाने शेतकरी इतका हवालदिल झालेला आहे की त्याच्या मनामध्ये जगण्याची आशा अंधुक होत चालली आहे. अशा वेळेस शासनाने जर शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले तर शेतकऱ्यांची हिंमत नक्कीच वाढणार आहे. निवडणुका काय होत राहतील. राजकारण काय होत राहणार. परंतु दुःखाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीवर धीराचा आधार जर दिला जात असेल तर नक्कीच शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल. शेतकऱ्यांच्या सोयाबीनला शेतकरी मागतो त्याप्रमाणे भाव द्यायला सरकारला काय अडचण आहे. तुमच्याकडे इतर योजना राबविण्यासाठी पैसाच पैसा आहे. मग शेतकऱ्यांसाठी का नाही. शेतकऱ्यांनाही घर आहे, दार आहे, बैल आहे, गाईम्हशी आहे. नातीगोती आहे. शेतकऱ्यांनाही आई-वडील बहिण, भाऊ, मुले बायको अशी नाती असतात. अखंड कष्ट करीत घाम गाळून पिकवलेल्या मालाची ऐनवेळी जर निसर्गाच्या प्रकोपामुळे नुकसान होणार असेल तर शासनाने अशा शेतकऱ्यांना आर्थिक मदत करायला पाहिजे.

सरकारचे कामच आहे अडचणी सापडलेल्या लोकांना मदत करणे. पण दुर्दैवाने सरकार आपल्या मस्तीमध्ये गुंग आहे. आपले आमदार, आपले खासदार, आपले कार्यकर्ते यांच्यावर मेहरबान असलेले सरकार शेतकऱ्यांकडे मात्र दुर्लक्ष करत आहे. शेतकऱ्यांच्या मनातील सरकारच्या प्रती असलेला हा असंतोष जर मतदान मतपेटीतून उतरला तर सरकारला पळता भुई थोडी होईल.काही खरं नाही. सरकारने फसव्या योजनांकडे लक्ष देऊन लोकांच्या मनात सहानुभूती निर्माण करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या जीवनाच्या प्रश्नाकडे लक्ष देणं अनिवार्य आहे. सरकारने लक्ष दिले तरच शेतकरी जगेल. शेतकरी वाढेल. शेतकरी मोठा होईल. अन्यथा शेतकऱ्याला सरकारच्या उदासीनतेमुळे व सोयाबीनच्या या परतीच्या पावसाने सोयाबीन भिजवले आहे. शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. सोयाबीनच्या नुकसानीने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. ते अश्रू पुसण्याचे कर्तव्ये सरकारने केले पाहिजे. झालेली ही नुकसान भरपाई भरण्यासाठी मायबाप सरकारने पुढे यावे.

# आ.किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर धानोरा बॅरेजला प्रशासकीय मान्यता

## शेकडो हेक्टर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार पहिल्या टप्यात ५ कोटी ४२ लाख रुपयांची मंजुरी

**बॅरेजची महत्त्वता-सिंचनासाठी महत्त्वपूर्ण, भूजलपातळी वाढवणे, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवणे.**
**मंजूरी-पहिल्या टप्यात ५ कोटी ४२ लाख रुपये.**
**उत्पन्न-शेतीच्या विकासात महत्त्वाचा योगदान.**



> **“ चंद्रपूर जिल्ह्याच्या दक्षिणेकडे वाहणाऱ्या वर्धा नदीवर लोअर वर्धा धरणाखाली सध्या कोणताही मोठा प्रकल्प नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या हक्काचे सुमारे ७३६ दलघमी पाणी विनावापर तेलंगणात वाहून जात आहे. या पाण्याचा काही भाग चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी वापरण्याच्या उद्देशाने धानोरा बॅरेज बांधण्याची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील धानोरा गावाजवळील वर्धा नदीवर बॅरेज बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी चंद्रपूर मतदारसंघाचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी सातत्याने लावून धरली होती. त्यांच्या या मागणीला यश मिळाले असून, या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पहिल्या टप्यात ५ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

वर्धा नदीच्या पाण्याचा प्रभावीपणे उपयोग करून घेण्यासाठी आणि परिसरातील शेतीला चालना देण्याच्या उद्देशाने धानोरा बॅरेज प्रकल्प हा महत्त्वाचा ठरणार आहे. धानोरा बॅरेज बांधकाम प्रस्तावाच्या सर्वेक्षण, संकल्पना, आणि सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाने केंद्रीय संस्थेसोबत करार केला आहे. मात्र, या उपसा सिंचन योजनेसाठी मान्यता शासनाकडून मिळत नव्हती. त्यामुळे या कामाला प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी सातत्याने प्रयत्न केले.आखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्प लवकरच सुरू होणार असून, या प्रकल्पामुळे आसपासच्या शेकडो हेक्टर शेतीचा सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे. तसेच, पाण्याच्या भूजलपातळी वाढण्यास व पिण्याच्या पाण्याची समस्या सुटण्यास मदत होणार आहे. त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळाल्यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये आनंदाची लाट पसरली आहे. आमदार किशोर जोरगेवार यांचे हे धाडस व सातत्य सर्वांसाठी प्रेरणादायक आहे.

# फुटपाथ आमच्या हक्काचे,बदलापूर मध्ये चालण्यासाठी फुटपाथ गायब

> **मोकळे फुटपाथ आणि चालण्यासाठी सुरक्षित जागा असणे हा प्रत्येक नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे पण बदलापूर मध्ये फुटपाथ हे शिल्लक राहिलेच नाही त्यामुळे बदलापूर नगरपरिषदेने या गोष्टीवर योग्य तो विचार करून फूटपाथ अडवणूक करणाऱ्यावर योग्य ती कारवाई करावी तरच बदलापूरकरांना मोकळे फुटपाथ मिळू शकते। सिद्धेश विचारे- बदलापूर स्थानिक रहिवासी**




**बदलापूर । प्रतिनिधी**

पादचाऱ्यांचा रस्त्यांवर अग्रहक्क असतो असं म्हणतात पण हल्ली रस्ते पादचाऱ्यांसाठी राहिले नाहीतच पण त्यांच्या हक्काचे फूटपाथही त्यांचे राहिलेले नाही बदलापूरमध्ये तर सर्व महत्त्वाच्या रस्त्यांवरील फूटपाथवर अतिक्रमण झाले आहे नगरपरिषद, लोकप्रतिनिधी, नागरिक, फेरीवाले, पोलिस या सगळ्यांच्याच एकत्रित सहभागातून फूटपाथमुक्त होऊ शकतात आणि चालणाऱ्यांना हक्काची वाट मिळू शकते. फूटपाथ आपल्यासाठी खरंच असतात का असा बदलापूरकराना कायम प्रश्न पडतो. अतिक्रमण, भिकारी, कचरा, फूटपाथकडे दुर्लक्ष याबद्दलच्या समस्यांना बदलापुरात विविध ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांना सामोरे जावे लागते

फुटपाथवर दुकानदारांनी अतिक्रमण केले आहे. तर काही ठिकाणी फेरीवाल्यांनी फुटपाथवर ताबा मिळवला आहे फेरीवाले फुटपाथवर बसतात. व जो फूटपाथ शिल्लक राहतो त्यावर दुकानदार त्यांच्या दुकानातील साहित्य आणि बोर्ड मांडून ठेवतात. त्यामुळे नागरिकांना चालण्यास त्रास होतो. विशेष करुन महिलांना जास्त त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अनेकदा वादही होतात. असाच प्रकार बदलापूर स्टेशन रोडच्या बाजूला असलेल्या फुटपाथवर दिसून येतो

बदलापूर स्टेशनरोड हा रहदारीसाठी मुख्य रस्ता असून या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या दुकानदारांनी पूर्ण फुटपाथची जागा आपल्या व्यवसायासाठी वापरत आहेत त्यामुळे फुटपाथावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांना खूप त्रासाला सामोरे जावे लागते नक्की फुटपाथ हे व्यवसाय करण्यासाठी आहेत की नागरिकांना चालण्यासाठी आहेत हाच प्रश्न बदलापूरकराना आजुन पर्यंत समजू शकले नाही या साऱ्या अतिक्रमणामुळे नागरिकांनी कुठून चालावे हे नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे तसेच बदलापूर नगरपरिषदेचे अधिकारी या दुकानदारांवर कोणतीही कारवाई करताना दिसत नाही स्थानिक कार्यकर्ते व राजकीय नेते यांनी सुद्धा याकडे दुर्लक्ष केलेला दिसून येतो कधी फुटपाथ मोकळा श्वास घेतील व नागरिकांना आपल्या हक्काच्या फुटपाथवर चालता येणार आहे.

# अन्न परब्रम्ह,सर्वांचे आद्य कर्तव्य

जागतिक अन्न दिन हा १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या स्थापनेच्या तारखेच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जगभरात साजरा केला जातो. हा दिवस भूक आणि अन्न सुरक्षेशी संबंधित इतर अनेक संस्थांद्वारे मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो, ज्यामध्ये जागतिक अन्न कार्यक्रम, जागतिक आरोग्य संघटना, आणि कृषी विकासासाठी आंतरराष्ट्रीय निधी यांचा समावेश आहे. वर्ल्ड फूड प्राइज फाउंडेशनला २०२० चे शांततेचे नोबेल पारितोषिक भूकेशी लढा देण्यासाठी, संघर्षाच्या भागात शांततेसाठी योगदान देण्यासाठी आणि युद्ध व संघर्षाच्या काळात भुकेचा वापर थांबवण्यात प्रमुख भूमिका बजावल्याबद्दल मिळाले.

२०१४ साठी जागतिक अन्न दिनाची थीम कौटुंबिक शेती होती. जगाला अन्न देणे, पृथ्वीची काळजी घेणे; २०१५ मध्ये ते सामाजिक संरक्षण आणि कृषी: ग्रामीण गरिबीचे चक्र तोडणे होते; २०१६ मध्ये हवामान बदलत आहे. अन्न आणि शेती देखील आवश्यक आहे, ही थीम २००८ आणि त्यापूर्वी २००२ व १९८९ च्या थीमचे प्रतिध्वनित करते. २०२० ची थीम वाढा, पोषण करा, टिकून राहा, एकत्र. आमच्या कृती हे आमचे भविष्य आहे. जागतिक अन्न दिनाची स्थापना अन्न आणि कृषी संघटनेच्या सदस्य देशांनी नोव्हेंबर १९७९ मध्ये संघटनेच्या २० व्या सर्वसाधारण परिषदेत केली. हंगेरीचे माजी कृषी आणि अन्न मंत्री डॉ. पाल रोमानी यांच्या नेतृत्वाखाली हंगेरियन शिष्टमंडळाने अन्न आणि कृषी संघटन परिषदेच्या २० व्या सत्रात सक्रिय भूमिका बजावली आणि जागतिक अन्न दिन जगभरात साजरा करण्याची कल्पना सुचवली. तेव्हापासून दरवर्षी १५० हून अधिक देशांमध्ये हा दिवस साजरा केला जातो, ज्यामुळे गरिबी आणि उपासमारीच्या समस्यांबद्दल जागरुकता निर्माण होते. १९८१ पासून जागतिक अन्न दिनाने प्रत्येक वर्षी एक वेगळी थीम स्वीकारली आहे, ज्यामुळे कृतीसाठी आवश्यक



**प्रविण बागडे**
**नागपूर**
**९९२३६२०९१९**

असलेल्या क्षेत्रांवर प्रकाश टाकण्यास आणि एक सामान्य फोकस प्रदान करण्यास मदत होते.

अन्न हा कोणताही पदार्थ आहे, जो जीवांना पौष्टिक समर्थन प्रदान करण्यासाठी वापरला जातो. कर्बोदके, मेद, प्रथिने आणि पाणी यांपासून तयार झालेला आणि पोषणासाठी प्राणी खाऊ शकतात असा कोणताही पदार्थ अन्न म्हणून ओळखला जातो. अन्न सहसा वनस्पती किंवा प्राणी उत्पत्तीचे असते, आणि त्यामध्ये आवश्यक पोषक घटक जसे की कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, प्रथिने किंवा खनिजे यांचा समावेश असतो.

ऐतिहासिक दृष्ट्या, मानवांनी दोन पद्धतींनी अन्न सुरक्षित केले: शिकार गोळा करणे आणि शेती. या दोन्ही पद्धतींनी आधुनिक मानवांना सर्वभक्षी आहार प्रदान केला. जगभरात मानवतेने असंख्य पाककृती आणि पाककला तयार केल्या आहेत, ज्यामध्ये घटक, औषधी वनस्पती, मसाले, तंत्र आणि पदार्थांचा समावेश आहे. आज जगातील सतत वाढणाऱ्या लोकसंख्येस आवश्यक असणारी बहुतेक अन्न ऊर्जा अन्न उद्योगाद्वारे पुरविली जाते.

आंतरराष्ट्रीय खाद्य संघटना, जागतिक संसाधन संस्था, जागतिक अन्न कार्यक्रम, अन्न व कृषी संघटना, आणि आंतरराष्ट्रीय अन्न माहिती परिषद अशा संस्थांद्वारे अन्न सुरक्षा नियंत्रित केली जाते. अन्नाचा हक्क हा आंतरराष्ट्रीय, आर्थिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक हक्क (आयसीईएससीआर) आंतरराष्ट्रीय कराराद्वारे प्राप्त केलेला मानवाधिकार आहे, ज्याची ओळख पुरेशा अन्नासह समाधानकारक जीवनशैलीचा हक्क आणि भुकेपासून मुक्त होण्याचा मूलभूत अधिकार अशी आहे.

अन्नाचा बहुतेक भाग सुंयगांच्या तीन प्रधान घटकांचा बनलेला असतो: कार्बोहायड्रेट, वसा, आणि प्रथिने. याशिवाय, जीवनसत्त्वे, खनिजे, आणि इतर कार्बनी संयुगे व पाणी देखील आवश्यक असतात.

बहुतेक अन्नाची उत्पत्ती वनस्पतींमध्ये होते. काही अन्न थेट वनस्पतींमधून प्राप्त केले जाते. परंतु जे अन्न स्रोत म्हणून वापरले जातात ते प्राणी देखील वनस्पतींमधून मिळणारे अन्न देऊन वाढविले जातात. तृणधान्य हे मुख्य अन्न आहे जे जगातील कोणत्याही प्रकारच्या पिकापेक्षा अधिक अन्न ऊर्जा देते. कॉर्न (मका), गहू, आणि तांदूळ या सर्व प्रकारांचा जगभरातील धान्य उत्पादनात ८७% वाटा आहे.आजच्या दिवशी अन्नदात्या बळीराजाला धन्यवाद म्हणु या आणि दररोज अन्न शिल्लक राहून वाया जाणार नाही याची काळजी घेऊ या.

अन्न वाचवा, जग वाचवा!

जागतिक अन्न दिनाच्या शुभेच्छा!!

# उड्डाणपुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देता आले हे माझे भाग्य

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आजच्या दिवशी चंद्रपूरच्या दीक्षाभूमीवर लाखोंच्या समुदायाला बौद्ध धम्माची दीक्षा दिली. शोषित, वंचितांचा आवाज बुलंद केला. बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा घेऊन संघटीत भावनेने कार्य करावे. आज उड्डाणपुलाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देता आले, हे माझेच भाग्य समजतो, अशी भावना राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.





चंद्रपूर येथील बाबूपेठ उड्डाणपूलाचे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल' असे नामकरण मंगळवारी (दि. १५) करण्यात आले. यावेळी ना. मुनगंटीवार बोलत होते. या कार्यक्रमाला माजी समाजकल्याण सभापती ब्रीजभूषण पाझारे, महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, मंगेश गुलवाडे, सूरज पेदुलवार, प्रज्वलंत कडू, किरण बुटले, सविता कांबळे, धम्मप्रकाश भस्मे, संदीप आगलावे, प्रदीप किरमे, कल्पना बगुलकर, आकाश ठुसे, दशरथ सोनकुसरे, प्रमोद रामटेके यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी ना. सुधीर मुनगंटीवार यांनी बाबूपेठ उड्डाणपूलाचे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे नामकरण झाल्याचे जाहीर केले. उड्डाणपुलाचा नामविस्तार झाल्याबरोबर बाबासाहाबांचे नाव दर्शनी भागात दिसेल असे लावण्याची सूचना देखील त्यांनी केली. ज्या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चंद्रपुरातील दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा दिली, त्याच दिवशी उड्डाणपूलाला बाबासाहाबांचे नाव देणे हा सुवर्ण कांचन योग असल्याचे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी नमूद केले.बाबूपेठ भागात उड्डाणपूल व्हावा ही अनेक वर्षांची मागणी होती. राज्याचा अर्थमंत्री म्हणून सूत्रे हाती घेतली व त्यावेळी यासाठी पुढाकार घेतला. या जागेवर असलेल्या झोपड्यांचा मोठा प्रश्न पुढे होता. एकीकडे कायदा होता तर एकीकडे मानवता भाव होता. मात्र कॅबिनेटमध्ये विशेष बाब करून झोपडपट्टी धारकांना मोबदला मिळवून दिला. हा उड्डाणपूल यापूर्वीच व्हावा असे प्रयत्न होते. मात्र पुढे महाविकास आघाडी आणि कोव्हिडमुळे विलंब झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बाबूपेठ भागामध्ये अनेक विकास कामांना मूर्त रूप दिल्याचे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. ते म्हणाले, 'बाबूपेठमध्ये पहिल्यांदा एपीजे अब्दुल कलाम उद्यान केले. येथील मैदानात स्टेडियम व्हावे अशी मागणी झाली त्या ठिकाणी स्टेडियम केले. रस्ते खराब झाल्याने सरकार नसतानाही तत्कालीन सरकारशी भांडून १६ कोटी रुपयांचे रस्त्यांना मंजूरी मिळवून दिली. उड्डाणपूल पूर्ण केला. आता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शाळा पंतप्रधान योजनेमध्ये दत्तक दिली. यासोबतच नेताजी सुभाषचंद्र बोस चौकातील शाळेला ३ कोटी रुपये निधी मंजूर केला. या शाळेत गोरगरीबांची ११०० मुले शिकतात. त्या मुलांना याचा फायदा होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.भारतीय जनता पार्टीचे नेते आणि कार्यकर्ते सर्वजण सेवेसाठी तत्पर आहोत. कधीही विकासाच्या कामात जात पाहिली नाही. मात्र तरीही काही लोक विष पेरण्याचे काम करतात व विकासात आडकाठी करण्याचे काम करतात, असेही त्यांनी सांगितले.

# रंभापुरा येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारणार – जिल्हाप्रमुख महेश चिवट

**सोलापूर । प्रतिनिधी**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा शासनाच्या सर्व परवानग्या घेऊन लवकरच उभारण्याचा संकल्प शिवसेनेने केला आहे. रंभापुरा येथील छत्रपती संभाजी महाराज चौकात हा पुतळा उभारण्याचा निर्णय असून, पुतळ्याबरोबरच चौकाच्या सुशोभीकरणासाठीही कामे करण्यात येणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी दिली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून या चौकाच्या सुशोभीकरणासाठी १३ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या कामाचे भूमिपूजन आज उत्साहात पार पडले. कार्यक्रमाला शिवसेना शहरप्रमुख संजय शीलवंत, उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील, रामभाऊ ढाणे, अमर (भैय्या) करंडे, मनोज राखुंडे, दत्तात्रय ढाणे, बळीराम दुधात, ज्योतीराम ठाणे, नितीन करंडे, संभाजी ढाणे, रंभापुरा शाखाप्रमुख निलेश चव्हाण, महेश गोडसे, बापू करंडे, श्रीराम करंडे, धनंजय माने, राहुल कवडे, तात्या ढाणे, संजय टेकाळे, दादा कदम, कल्याण ठाणे, परशुराम तांबे, बंडू ठेके आणि प्रदीप अडसूळ आदी मान्यवर उपस्थित होते. शिवसेना शाखाप्रमुख निलेश चव्हाण यांनी सांगितले की, करमाळा शहरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारणे ही शिवप्रेमींची मागणी होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या पुतळ्याला मान्यता देत सर्व प्रशासकीय मंजुरी आणि आर्थिक मदतीची हमी दिली असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रकल्पासाठी सर्व टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा हा समाजासाठी प्रेरणादायी ठरेल आणि या चौकाचे सुशोभीकरण शहराच्या सौंदर्यात भर घालेल, असा विश्वास कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला.

# भंडारा पोलिसांकडून ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा: माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त भंडारा जिल्हा पोलिसांनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले. भंडारा पोलिस मुख्यालयासमोरील लॉनमध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नूरुल हसन आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या उपस्थितीने विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी राखीव पोलीस निरीक्षक दुबे, उपनिरीक्षक प्रधान, नक्षल सेलचे निरीक्षक उके आणि क्यूआरटी शाखेचे अधिकारी व अंमलदारही उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या शैक्षणिक व वैज्ञानिक योगदानाचे स्मरण केले. कार्यक्रमाचा समारोप शांततामय वातावरणात झाला.



# ब्रिलीअंट सीबीएसई स्कूल हिंगणघाट येथे डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन व अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था संचालित ब्रिलीअंट सीबीएसई स्कूल येथे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी वाचन प्रेरणा दिन आणि अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षतेसाठी अभय दांडेकर, मुख्याध्यापक, ब्रिलीअंट स्कूल हिंगणघाट उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन उपक्रमात भाग घेतला. यावेळी अभय दांडेकर यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत त्यांच्या देशाच्या जडणघडणीत केलेल्या योगदानाचे महत्त्व विशद केले.कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका रेणुका दानव यांनी केले, तर आभार सूनल काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यास आणि डॉ. कलाम यांच्या कार्याला सन्मान देण्यास मदत झाली.

# अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध–आमदार संजय शिंदे

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा मतदारसंघातील अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध राहणार असल्याचे आश्वासन आमदार संजय शिंदे यांनी दिले. करमाळा शहरातील विविध विकासकामांचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते पार पडले, त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी ईदगाह मैदान परिसराचे सुशोभीकरण आणि वॉल कंपाऊंड बांधणे, सुलेमानी मस्जिदसमोरील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, मुलाणवाडा दफनभूमीसाठी वॉल कंपाऊंड व पोहोच रस्ता उभारणे, बेग-फकीर दफनभूमीसाठी वॉल कंपाऊंड उभारणे, तसेच फारूक जमादार घर परिसरातील रस्त्याचे कॉंक्रीटीकरण आणि पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे या विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.कार्यक्रमात ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक येवले, माजी पंचायत समिती सदस्य ॲड.



राहुल सावंत, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भरत आवताडे, माजी नगरसेवक प्रविण जाधव, बापू तांबे, देवा लोंढे, संतोष सापते, माजी उपनगराध्यक्ष अहमद कुरेशी, माजी नगरसेवक नजीर अहमद कुरेशी, अर्बन बँकेचे माजी संचालक कलिम काझी सर आणि माजी व्हा. चेअरमन फारूकभाई जमादार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी संभाजी ब्रिगेडचे राज्य प्रवक्ते हर्षल बागल, माजी सरपंच भोजराज सुरवसे, एकलव्य आश्रमशाळेचे अध्यक्ष रामकृष्ण माने, उद्योजक संतोष कुलकर्णी आणि सकल मुस्लिम समाजाचे शहराध्यक्ष जमीर सय्यद यांसह अनेक सामाजिक कार्यकर्तेही सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संयोजन आणि सूत्रसंचालन राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष व बार्शी विधानसभा निरीक्षक आशपाक जमादार यांनी केले. आमदार शिंदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून समाजाच्या विकासासाठी प्राधान्याने निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले. या कामांमुळे अल्पसंख्याक समाजाच्या विकासाला गती मिळेल आणि सर्वांगीण प्रगती साधता येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# राजकारणातून समाजकारण आकाश येसनकर यांचा युवकासाठी प्रेरणादायी उपक्रम–मंगेश पोटवार



**मूल । प्रतिनिधी**

१४ ऑक्टोबर हा धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेष महत्त्वाचा आहे. याच दिवशी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर अध्यक्ष आकाश येसनकर यांनी त्यांच्या शहर अध्यक्षपदाच्या कार्यकाळाच्या एक वर्षाच्या निमित्ताने उपजिल्हा रुग्णालय, मूल येथे नवजात बालकांना मच्छरदाणी सहित बेबी किटचे वाटप करून समाजसेवेचा एक अनोखा उपक्रम राबवला. या उपक्रमात तालुकाध्यक्ष मंगेश पोटवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महिलांच्या आणि नवजात बाळांच्या आरोग्याबद्दल विशेष चर्चा करण्यात आली. आकाश येसनकर यांनी मच्छरदाणीच्या उपयोगामुळे होणाऱ्या सुरक्षिततेवर भर देत सांगितले, नवजात बाळांसाठी मच्छरांपासून संरक्षण अत्यावश्यक आहे, आणि मच्छरदाणी हे एक साधे पण प्रभावी उपाय आहे. त्यांच्या या संवेदनशील विचारांनी उपस्थितांची मनं जिंकली. कार्यक्रमाला उपजिल्हा आरोग्य अधिकारी कुळमेथे सर आणि इतर मान्यवरांनी हजेरी लावली व येसनकर यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. त्यांनी असेही नमूद केले की, अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्यविषयक जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत होते.याप्रसंगी लाभ घेतलेल्या महिलांनी आकाश येसनकर यांच्या या समाजकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. नवजात बाळांच्या सुरक्षिततेसाठी दिलेल्या मच्छरदाणीमुळे त्यांना मोठी मदत झाली असल्याचे त्यांनी सांगितले. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या या पवित्र दिवशी आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शहराध्यक्षपदाच्या वर्षपूर्तीनिमित्ताने साजरा करण्यात आलेला हा समाजसेवा उपक्रम मूल परिसरात सकारात्मक संदेश देत आहे.याप्रसंगी उपस्थित राहणाऱ्या मान्यवरांमध्ये राष्ट्रवादी तालुका युवक अध्यक्ष रोहित कामडे, महिला शहर अध्यक्ष धाराताई मेश्राम, रंजना सुखदेवे, रोहित शेंडे, आदित्य गेडाम, सौरभ वायडे, नयन लाकडे, प्रेम दहिवले इत्यादींचा समावेश होता.

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा

**येणापूर । प्रतिनिधी**

१५ ऑक्टोबर रोजी, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त इंदिरा गांधी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून अतुल येलमुले, सदस्य, गोंडवाना शिक्षण प्रसारक मंडळ उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून वासुदेव गोंगले, पर्यवेक्षक, प्रमुख मार्गदर्शक म्हणून इसाक कुरेशी आणि समस्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभात विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाची प्रेरणा देण्यासाठी ग्रंथालयातील विविध पुस्तके देण्यात आली. मार्गदर्शक म्हणून इसाक कुरेशी यांनी डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना व त्यांचे विचार विद्यार्थ्यांना सादर केले.अध्यक्षीय भाषणात अतुल येलमुले यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले आणि उत्कृष्ट नागरिक बनण्यासाठी वाचनाची गरज व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन कमलकिशोर कन्नाके यांनी केले. उपस्थित सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला व वाचनाची महत्त्वपूर्णता लक्षात घेतली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होईल आणि ते भविष्याकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.




# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने इंदापूर तालुक्यातील 'जंक्शन' 'एमआयडीसी' चा प्रश्न मार्गी

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील प्रस्तावित 'जंक्शन' 'एमआयडीसी' साठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या ताब्यातील १३१ हेक्टर ५० आर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला हस्तांतरित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने हा प्रश्न मार्गी लागला आहे, ज्यामुळे इंदापूरकरांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे म्हणाले की, इंदापूर तालुक्यातील तरुणांसाठी रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी जंक्शन येथील 'एमआयडीसी' प्रस्तावित करण्यात आली होती. यासाठी २० हेक्टर ३८ आर मौजे जंक्शन, २४ हेक्टर २४ आर मौजे भरणेवाडी, २१ हेक्टर १८ आर मौजे अंथुर्णे आणि ६५ हेक्टर ७० आर मौजे लासुर्णे या चार गावेतील एकूण १३१ हेक्टर ५० आर क्षेत्र हस्तांतरण केले जाईल.या निर्णयामुळे अनेक उद्योग इंदापूर तालुक्यात येणार आहेत, त्यामुळे स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध होईल. आमदार दत्तात्रय भरणे आणि इंदापूर तालुक्यातील जनतेने उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत.

# स्त्रीत्व केवळ समानता नव्हे तर,आत्मसन्मान आणि आत्मनिर्भरता : सुप्रसिद्ध कवयित्री श्रद्धा शौर्य

## एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात शक्ती ऊर्जा सत्र या कार्यक्रमाचे आयोजन

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

येथील एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाच्या महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल आणि युथ भारती फाऊंडेशन विदर्भ यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्रोत्सवानिमित्त शक्ती ऊर्जा सत्र आयोजित करण्यात आले. या सत्राचा मुख्य उद्देश स्त्रीशक्ती आणि महिला साक्षमीकरण यावर सखोल चर्चा करणे हा होता, ज्याचे नेतृत्व सुप्रसिद्ध कवयित्री, वक्त्या आणि निर्भीड सूत्रसंचालिका कु. श्रद्धा शौर्य यांनी केले.





श्रद्धा शौर्य यांनी आपल्या शैलीने मंत्रमुग्ध करीत स्त्रीत्व केवळ समानता नव्हे तर, आत्मसन्मान आणि आत्मनिर्भरता आहे, असे स्पष्ट केले. त्यांनी प्रतेक स्त्रीने निर्भीड होऊन जगणे शिकले पाहिजे, असे आव्हान उपस्थित केले.

सत्राची सुरुवात सहाय्यक कुलसचिव डॉ. बाळू राठोड यांनी प्रमुख वक्त्या श्रद्धा शौर्य यांचा परिचय देऊन केली. त्यांनी श्रद्धा शौर्य यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. प्रमुख वक्त्या श्रद्धा शौर्य यांनी आपल्या प्रभावी कवितांच्या माध्यमातून स्त्रीशक्ती, तिच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक भूमिकांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी उपस्थित विद्याथिनींना त्यांच्या हक्कांसाठी निर्भीडपणे लढण्याची प्रेरणा दिली.भारतीय संस्कृतीचा मौल्यवान वारसा पुढे नेण्याच्या संकल्पनेवर आधारित चर्चात्मक सत्राचे आयोजन करण्यात आले. यामध्ये श्रद्धा शौर्य यांनी पारंपरिक आणि आधुनिक स्त्रीवादावर आपल्या ठाम विचारांची मांडणी केली.कार्यक्रमाचे अध्यक्षपद एस.एन.डी.टी महिला विद्यापीठाचे माननीय संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी भूषवले. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, समाजात स्त्रियांना अधिक शक्तीशाली बनवण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता आहे. यावेळी समन्वयक वेदांत अल्मस्ट आणि सांस्कृतिक प्रमुख अश्विनी वाणी यांनीही आपली उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनी या सत्राचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.युथ भारती फाऊंडेशनचे अंकित कलकोटवार यांनी आपल्या भाषणात स्त्रीशक्तीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत विद्याथिनींना समाजसेवेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी समाजात स्त्रियांच्या भूमिका कशा अधिक प्रभावी होऊ शकतात याचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे आयोजन अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात झाले. विद्याथिनींच्या सहभागामुळे हा कार्यक्रम अधिक यशस्वी ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपेक्षा पिंपळे यांनी केले.

# आदर्श आचारसंहितेच्या काळात निर्बंध लागू जिल्हाधिकाऱ्यांनी निर्गमित केले आदेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ ची आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू झाली आहे. संपूर्ण निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचे यथायोग्य पालन करण्याचे दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील संपूर्ण कार्यक्षेत्रात आदर्श आचारसंहिता अंमलात असेपर्यंतच्या कालावधीकरिता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ मधील तरतुदीनुसार खालील बाबींवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत. तसे आदेश जिल्हादंडाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमीत केले आहेत.



१. शासकीय कार्यालये/विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणुका काढण्यास, घोषणा देणे/ सभा घेणे इत्यादीवर निर्बंध राहतील.

२. शासकीय/निमशासकीय सार्वजनिक मालमत्तेची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपीकरण करण्यास निर्बंध, ३. उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळीस ताफ्यामध्ये ३ पेक्षा जास्त मोटारगाडया/वाहने तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मिटर परिसरात व दालनात ५ व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश करण्यास निर्बंध राहतील.

४. निवडणुक प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत इतर उमेदवाराचे नाव व चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चीत केल्याप्रमाणे कागद वापरणे तसेच निश्चीत केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रीका छपाईस निर्बंध राहतील.

५. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत इतर उमेदवारांचे नाव व चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे तसेच निश्चित केलेल्या कागदपत्राच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छपाईस निर्बंध,

६. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे २०० मी. परिसरात धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषणे करण्यावर निर्बंध राहतील.

६. धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणाचे जवळपास तात्पुरते पक्ष कार्यालय स्थापन करण्यास निर्बंध, ७. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जात/धर्म/भाषावार शिबिरांचे आयोजन करण्यावर निर्बंध,

८. निवडणुकीचे प्रचाराकरीता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबींवरनिर्बंध,

९. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खाजगी व्यक्तींच्या जागेवर/सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके जागा मालकाच्या व संबंधीत प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय लावण्यास निर्बंध राहतील. १०. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत प्रचार/रॅली/रोड–शो याकरीता वाहनाच्या ताफ्यात १० पेक्षा अधिक मोटार गाडया/वाहने वापरण्यास निर्बंध राहतील.

सदर आदेश जिल्हाधिकारी यांच्या सहीनिशी कोर्टाच्या शिक्कानिशी १५ ऑक्टोबर २०२४ रोजी देण्यात आला आहे.

# विद्यार्थी जिज्ञासू आणि चिकीत्सक बनावे – गणेश करे पाटील

**सोलापूर । प्रतिनिधी**

परशुराम शिक्षण प्रसारक मंडळाच्या पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय, रावगाव येथे दसऱ्याच्या औचित्य साधून शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या हेतूने गणेश करे पाटील, संस्थापक अध्यक्ष यश कल्याणी सेवाभावी संस्थेच्या वतीने सहा टीव्ही संच भेट म्हणून देण्यात आले. याचबरोबर शाळेमध्ये बसवण्यात आलेल्या १० सीसीटीव्ही कॅमेराचे उद्घाटन रावगावचे विद्यमान सरपंच संदीप शेळके, उपसरपंच भाऊसाहेब करगळ, प्रमुख पाहुणे गणेश करे पाटील, रावगाव ग्रामपंचायतचे आजी–माजी पदाधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना गणेश करे पाटील म्हणाले की, पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय एक आदर्श विद्यालय आहे. येथे प्रत्येक वेळी काही ना काही नाविन्यपूर्ण बाब बघायला मिळते. या विद्यालयातील विद्यार्थी गुणवंत आहेत आणि कोणत्याही स्पर्धेत सहभागी होऊन आपले यश दाखवतात. त्याचबरोबर त्यांनी शाळेतील शिक्षकांचे कार्य गौरवताना भविष्यात एखादा शिक्षक राष्ट्रपती पदक विजेता व्हावा, अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमात आदर्श शाळा आणि आदर्श कर्मचारी पुरस्कार मिळाल्याबद्दल रावगाव ग्रामस्थांच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक विजय कोळेकर आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. विद्यमान सरपंच संदीप शेळके म्हणाले, या शाळेतील शिक्षकांचे समर्पण आणि विद्यार्थ्यांची प्रगती पाहून आम्ही गावकरी प्रभावित झालो आहोत. शाळेतील शिक्षक आणि आमच्या गावकऱ्यांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाले आहे.यावेळी नवनियुक्त शिक्षक सुहास कानगुडे आणि पप्पु राठोड यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमात माजी सरपंच दादासाहेब जाधव, विलास बरडे, सर्वपक्षीय नेतेमंडळी, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षकवृंद आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रताप बरडे यांनी केले, प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय कोळेकर यांनी केले, तर आभार किरण परदेशी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# समाजकार्याच्या विद्यार्थ्यांनी आयोजित केली विविध स्पर्धा



**वर्धा । प्रतिनिधी**

स्थानिक इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रा. सिद्धांत ढोके यांच्या मार्गदर्शनाखाली सालोड हिरापूर येथील जिल्हा परिषद कन्या शाळेत चित्रकला आणि निबंध स्पर्धेचे आयोजन केले.

या स्पर्धेत वर्ग ३ ते ४ च्या विद्यार्थ्यांना माझी सुंदर शाळा हा विषय देऊन निबंध आणि चित्र काढण्यास सांगितले गेले. स्पर्धेत ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि त्यांनी आपापले चित्र आणि निबंध घरून आणले. कार्यक्रमाला मार्गदर्शन सोनाली भूते यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल सायाम यांनी केले, तर आभार प्रदर्शन वैष्णवी पाटील पैक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शितल भस्मे, मनीषा सातकर, निता हादवे, पल्लवी दिवटे, मंजिरी माटे, मनीष गोठे, पूजा कोडापे, विशाल सयाम, साक्षी लोखंडे, विशाल उईके, नम्रता सोनोने आदी विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कला व सृजनशीलतेला चालना मिळाली असून, शालेय वातावरणात सकारात्मकता आणली आहे

# रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचा म्होरक्या हरपला माजी उपसरपंच शहाजी माने यांचे हृदयविकाराने निधन

**सोलापूर । प्रतिनिधी**

अंजनडोह येथील माजी उपसरपंच आणि रिटेवाडी उपसा सिंचन योजनेचे सक्रिय नेतृत्व करणारे शहाजी भाऊ माने (वय ५५) यांचे आज सायंकाळी सहा वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. सामाजिक आणि धार्मिक चळवळीत सक्रिय सहभाग घेणाऱ्या माने यांच्या अचानक जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



शहाजी माने हे प्रत्येक आंदोलनात पुढाकार घेत असून, विशेषत: मकाईच्या बिलासंदर्भातील आंदोलनांमध्ये त्यांचा मोलाचा सहभाग होता. त्यांच्या जाण्याने उपसा सिंचन योजनेला मोठा धक्का बसला आहे. माने धार्मिक कार्यक्रमांमध्येही उत्साहाने सहभागी होत असत आणि स्थानिक पातळीवर सामाजिक कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी आणि एक भाऊ असा परिवार आहे. अंत्यसंस्कार उद्या सकाळी १६ तारखेला, सकाळी दहा वाजता अंजनडोह येथे पार पडणार आहेत. त्यांच्या निधनाने रिटेवाडी उपसा सिंचन योजनेसाठी झटणारा खंबीर नेतृत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे.

# लाचेची मागणी भिगवण येथे वनरक्षकावर गुन्हा दाखल

**भिगवण । प्रतिनिधी**

मिळालेल्या माहितीनुसार, लहु किसन वणवे (वय ३० वर्षे), रा. खंडोबा माळ, पाटिल वस्ती, लाकडी, ता. इदापुर, जि. पुणे, हा वन विभागाच्या हद्दीतून ये–जा करत असताना पावसामुळे रस्त्यावर चिखल झाला. त्यामुळे घराकडे ये–जा करण्यासाठी असलेल्या फॉरेस्ट हद्दीतील वहिवाटीच्या रस्त्यावर मुरुम टाकला.यावरून उल्हास दत्तात्रय मोरे, वनरक्षक, भिगवण, ता. इंदापुर, जि. पुणे यांनी लहु वणवेवर गुन्हा दाखल न करण्यासाठी सात हजार रुपयांची (७००० रुपये) लाचेची मागणी केली. २३/ सप्टेंबर रोजी सकाळी १६.४५ ते दुपारी १७.२० वाजताच्या दरम्यान भिगवण येथील सोलापुर–पुणे रोडवरील भक्ती शक्ती प्युअर व्हेज हॉटेलमध्ये तडजोडीअंती सहा हजार रुपयांची (६००० रुपये) रक्कम स्वत:साठी व मेजर यांच्यासाठी मागणी करून लाच रक्कम स्वीकारण्यास मान्यता दिली.तपास अधिकारी पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांच्या ताब्यात लहु वणवेविरुद्ध गु. रजि. क्रमांक व कलम ३३२/२०२४ अंतर्गत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, ७अ प्रमाणे दि. १४/ ऑक्टोबर रोजी भिगवण पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला आहे.

# विधानसभा आढावा भेटीत मनोज जरांगे पाटील यांच्याकडून प्रा. रामदास झोळयांच्या कार्याचे कौतुक

**सोलापूर । प्रतिनिधी**

मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी करमाळा आणि माढा विधानसभा मतदारसंघातील परिस्थितीचा आढावा घेतला. या भेटीदरम्यान त्यांनी प्राध्यापक रामदास झोळ सर यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचे विशेष कौतुक केले. मराठा समाजाच्या प्रश्नांवर झोळ सरांनी केलेल्या कामामुळे समाजात त्यांचा मोठा आदर निर्माण झाला असून, त्यांच्या कार्याची दखल घेत जरांगे पाटील यांनी आगामी निवडणुकीसाठी झोळ यांना पाठिंबा दर्शवला आहे.



झोळ यांनी सुरुवातीपासूनच मराठा समाजाच्या आरक्षणासाठीच्या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला आहे. मुंबईतील आंदोलनासाठी करमाळा मतदारसंघातील बांधवांसाठी त्यांनी १०० गाड्यांसाठी मोफत इंधन आणि भोजनाची व्यवस्था केली होती. तसेच, सोलापूर आंदोलनातही ३५० गाड्यांसाठी मोफत इंधन पुरवले होते. याशिवाय, त्यांनी मराठा आणि बहुजन समाजासाठी शैक्षणिक सवलती आणि शिष्यवृत्तीसाठी शासनाकडे सातत्याने मागणी केली, ज्यामध्ये मुलींचे शिक्षण पूर्णत: मोफत करण्यात आले आहे, तर मुलांच्या शिक्षणावरील सवलतींचा पाठपुरावा सुरू आहे. प्रा. रामदास झोळ केवळ मराठा समाजासाठीच नव्हे, तर धनगर, मुस्लिम आणि बहुजन समाजासाठीही शैक्षणिक समानतेच्या सवलती मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. युवकांसाठी व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था, रोजगार निर्मिती, आणि नोकरी महोत्सवांद्वारे त्यांनी अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. जिल्ह्यात रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील विकासकामांसाठीही ते सातत्याने कार्यरत आहेत. झोळ सर यांनी विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असून, त्यांना मराठा आणि बहुजन समाजाचा व्यापक पाठिंबा मिळत आहे. मनोज जरांगे पाटील यांचा पाठिंबा आणि वरदहस्त लाभल्यामुळे त्यांच्या उमेदवारीला आणखी बळ मिळाल्याचे बोलले जात आहे. याचबरोबर, नारायणगड येथे दसरा मेळाव्यासाठी मराठा समाज बांधवांसाठी ५०० गाड्यांसाठी मोफत इंधनाची व्यवस्था झोळ सरांनी केली होती, याबद्दल जरांगे पाटील यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे. या आढावा भेटीनंतर मतदारसंघात राजकीय हालचालींना गती मिळाली असून, प्रा. रामदास झोळ सरांच्या उमेदवारीची चर्चा जोर धरत आहे. मतदारसंघातील विविध प्रश्नांवर झालेल्या सविस्तर चर्चेत जरांगे पाटील यांनी झोळ सरांना आगामी निवडणुकीत लढण्यासाठी प्रोत्साहन दिल्याचेही बोलले जात आहे.

# महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणास्त्रोत स्मारकांसाठी ५८.८८ लाख रुपयांचा निधी मंजूर

**मूल । प्रतिनिधी**

समाजकार्य व विकासासाठी अडचणींवर मात करत असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्या प्रवीण मोहुर्ले यांच्या पाठपुराव्यामुळे मूल येथील वॉर्ड क्रमांक २ आणि ३ साठी ५८.८८ लाख रुपये विकास निधी मंजूर करण्यात आले आहे. या निधीचा उपयोग थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि स्त्री शिक्षणाची जननी सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणास्त्रोत स्मारकांसाठी तसेच माळी समाज भवन व सौंदर्यीकरणासाठी करण्यात येणार आहे. याबाबत नामदार सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले गेले आहेत. त्यांच्या विकास आराखड्यातून मिळालेल्या या निधीमुळे माळी समाज बांधवांच्या मागण्या पूर्ण होणार आहेत. प्रवीण मोहुर्ले हे आपल्या कर्तृत्वामुळे नगरपरिषदेत उपाध्यक्षपदाच्या कार्यात यशस्वी झाले आहेत. त्यांनी आपल्या समाजाच्या प्रत्येक घटकाला न्याय देण्यासाठी स्वतःला समर्पित केले आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला त्यांनी न्याय देण्याची प्रेरणा दिली आहे.मूल तालुक्यातील ग्रामीण भागातही माळी समाजाला योग्य न्याय देण्यासाठी कार्यरत राहणारे प्रवीण मोहुर्ले हे समाजासाठी एक प्रभावी नेतृत्व ठरले आहेत. त्यांनी चित्तरंजन वाढई, मनीष कावळे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना यामध्ये सामील केले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने अशा नेतृत्वाला पाठिंबा देऊन प्रगतीसाठी कटिबद्ध राहण्याची विनंती प्रवीण मोहुर्ले यांनी केली आहे. दिवसा कंदील धरून फिरले तरी मिळत नाहीत, हे लक्षात ठेवून, समाजाच्या तळागाळातील व्यक्तींनी यशस्वी नेतृत्वाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, ही त्यांच्या तळमळ आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# चंद्रपूर जिल्ह्यात ५१,३९३ नवीन मतदारांची नोंद जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

मतदानाच्या हक्काचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने विविध उपक्रम राबवून नवीन मतदारांची नोंदणी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दिलेल्या माहितीनुसार, यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात ५१,३९३ नवीन मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना जिल्हाधिकारी गौडा यांनी याबाबत माहिती दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी उपस्थित होते.मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी प्रशासनाने 'स्वीप' (ड्रीेंशारींळल तींशिी' एर्वीलरींळेप रपव एश्रशलीेंरश्र झरीींळलळरींळेप) अंतर्गत अनेक उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमांत युवा मतदारांमध्ये जनजागृती, आठवड्यातील स्पर्धा, लकी ड्रॉ, प्रभात फेरी आणि शाळा-महाविद्यालयांमध्ये जनजागृतीचे उपक्रम यांचा समावेश आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात सहा विधानसभा मतदारसंघ आहेत: राजुरा, चंद्रपूर,बल्लारपूर,ब्रम्हपुरी, चिमूर,वरोरा जिल्ह्यात एकूण १८,४३,५४० मतदार असून यामध्ये पुरुष ९,३६,४१८, स्त्री ९,०७,०७४ आणि इतर ४८ आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात पुरुष व स्त्री मतदारांची संख्या खालीलप्रमाणे आहे:

***राजुरा-एकूण ३,२४,२०९**



***चंद्रपूर-एकूण ३,७२,४५५**
***बल्लारपूर-एकूण ३,११,०९४**
***ब्रम्हपुरी-एकूण २,७५,२२१**
***चिमूर-एकूण २,७९,५८१**
***वरोरा-एकूण २,८०,९८०**

जिल्ह्यात एकूण २,०७६ मतदान केंद्रे आणि ४६३६ बॅलेट युनिट्स, २६२० कंट्रोल युनिट्स व २७८७ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहेत.

उमेदवारास नामनिर्देशन पत्र व शपथपत्र भरून देणे आवश्यक आहे.सर्वसाधारण उमेदवारास १०,००० रुपये व अनुसूचित जाती/जमातीच्या उमेदवारास ५,००० रुपये जमा करणे आवश्यक आहे. उमेदवारास निवडणूक कालावधीत ४० लाख रुपये खर्चाची मर्यादा राखणे बंधनकारक आहे.

जिल्हा प्रशासनाने तक्रार निवारणासाठी मतदार मदत केंद्रे, नियंत्रण कक्ष, आदर्श आचारसंहिता कक्ष व मतदार हेल्पलाइन क्रमांक १९५० कार्यान्वित केले आहेत. आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रारी सी-व्हीजील पद्वारे ऑनलाईन नोंदविता येऊ शकतात. या सर्व उपक्रमांमुळे जिल्ह्यातील मतदारांची संख्या वाढवणे आणि मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## आ.किशोर जोरगेवार यांच्या हस्ते

# दीक्षाभूमीच्या विकासकामासह १०१ कोटी ९० लाख रुपयांच्या विविध कामांचे भूमिपूजन





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते मतदारसंघातील १०१ कोटी ९० लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये दीक्षाभूमी विकासकाम आणि वढा तीर्थक्षेत्राच्या विकासकामाचाही समावेश आहे.

गेल्या पाच वर्षांत, आ. किशोर जोरगेवार यांनी मतदारसंघाच्या विकासासाठी शासनाकडून मोठा निधी खेचून आणला आहे. या निधीतून शहरी व ग्रामीण भागाचा विकास करण्यात येत आहे. आज आ. जोरगेवार यांनी मतदारसंघातील तब्बल १०१ कोटी ९० लाख रुपयांच्या कामाचे भूमिपूजन केले. आ. किशोर जोरगेवार यांचा दीक्षाभूमीच्या विकासाचा संकल्पही पूर्ण झाला असून, ५६ कोटी ९० लाख रुपयांतून होणाऱ्या दीक्षाभूमीच्या विकासकामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच वढा येथील २५ कोटी रुपयांच्या विकासकामाचेही भूमिपूजन करण्यात आले. विदर्भाचे पंढरपूर मानल्या जाणाऱ्या वढा तीर्थक्षेत्राचा व्यापक विकास करण्याचा संकल्प आ. जोरगेवार यांनी केला होता, यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय, शहरातील प्रमुख मार्गासाठी मंजूर २० कोटी रुपयांच्या कामाचेही भूमिपूजन आ. जोरगेवार यांनी केले आहे, आणि या मार्गाचे काम तातडीने सुरू होणार आहे.

> **“ आ. किशोर जोरगेवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर धानोरा बॅरेजला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील धानोरा गावाजवळील वर्धा नदीवर बॅरेज बांधण्यासाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी आ. जोरगेवार यांनी सातत्याने केली होती. त्यांच्या या मागणीला यश मिळाले असून, या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात ५ कोटी ४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.**

# विभागीय रेल्वे प्रबंधकांच्या सकारात्मक प्रतिसादाने प्रवासी संघाच्या आशा पल्लवित

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा-भद्रावती-चंद्रपूर रेल्वे प्रवासी संघाचे अध्यक्ष राजेंद्र मर्दाने यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने विभागीय रेल्वे प्रबंधक (वाणिज्य) अमन मित्तल (भा.रे.या.से.) यांच्यासोबत सकारात्मक चर्चा केली. अमन मित्तल यांनी सर्व न्याय्य मागण्याबद्दल स्वतः पुढाकार घेऊन संबंधित वरिष्ठांकडे गांभीर्याने पाठपुरावा करण्याचे आश्वस्त केल्याने रेल्वे प्रवासी संघाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

रेल्वे संबंधित विविध मागण्यांबाबत शिष्टमंडळास ता. १५ ऑक्टोबर रोजी विभागीय रेल्वे प्रबंधकांनी आमंत्रित केले. या बैठकीत प्रवीण गंधारे, खेमचंद नेरकर, शाहिद अख्तर आणि अमोल पाटील यांचा समावेश होता.



चर्चेदरम्यान, मागील १७ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध रेल्वेविषयक मागण्यांचा उहापोह करण्यात आला. कोरोना काळात बंद झालेल्या रेल्वे सेवा आजतागायत बंद असल्याने सर्वसामान्य प्रवाशांची कशी ससेहोलपट होत आहे, हे उदाहरणासहित मित्तल यांना स्पष्ट करण्यात आले. तसेच, रेल्वे स्टेशन फलाटावर प्रवाशांच्या सुविधेसाठी आवश्यक असलेल्या बाबींवर चर्चा झाली. अमन मित्तल यांनी सर्व बारा मागण्यांबाबत न्यायोचित असल्याचे मान्य करत, मी स्वतः पुढाकार घेऊन वरिष्ठांकडे मांडेन, असे आश्वासन दिले. एकंदरीत, सर्व चर्चा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्याने प्रवासी संघाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.राजेंद्र मर्दाने यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सर्वसामान्य जनतेशी निगडित समस्यांचा निपटारा करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले. त्यांनी मुख्य महाप्रबंधक यांची मुंबई येथे आणि रेल्वे मंत्री महोदयांची लवकरच दिल्ली येथे भेट घेणार असल्याचे सांगितले.यावेळी मध्य रेल्वे, नागपूरचे विभागीय वाणिज्य निरीक्षक मंगेश तितरमारे आणि आरपीएफचे हेड कॉन्स्टेबल सैय्यद आबीद उपस्थित होते

# शासनाचा 'शिवभोजन थाळी' वितरण उपक्रम जनहिताचा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या अनेक जनहितकारी उपक्रमांपैकी 'शिवभोजन थाळी' वितरण खरेच जनहितकारी असल्याचे प्रतिपादन शिक्षिका प्रीती देवतळे यांनी केले. विजया दशमीच्या निमित्ताने प्रा. डॉ. अंजुम यांच्या हस्ते स्वीट वाटप करताना त्यांनी ही टिप्पणी केली.

प्रीती देवतळे पुढे म्हणाल्या की, तुकूम परिसरातील स्पर्धा परीक्षा देणारे युवक आणि युवती यांना 'शिवभोजन थाळी' उपक्रमाचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी शासन सेवेत स्थान मिळवले आहे, याबद्दल त्यांना आनंद आहे.




कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आनंद साव यांनी भोजन भांडी प्रदान केली, तर देवतळे परिवाराने आर्थिक सहकार्य दिले. याशिवाय, राजश्री शिंदे, सीमा दुपारे, देवराव कोंडेकर आणि खुशाल ठलाल यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले.कार्यक्रमाच्या शेवटी, प्रा. डॉ. अजूम कुरेशी, आनंद साव आणि देवतळे परिवाराचे आभार श्रीराम पान्हेरकर यांनी मानले.

# मुन्नुरू कापू समाजाचा केंद्रीय सुचीमध्ये समावेश हंसराज अहीर यांचे समाजाने मानले आभार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील महायुतीच्या सरकारने राज्य सुची क. १८९ मध्ये समाविष्ठ असलेल्या मुन्नुरू कापू समाजाचा केंद्रीय मागासवर्ग (ओबीसी) सुचीमध्ये समावेश करण्याची शिफारस केली होती. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने या शिफारशीकडे सकारात्मक पाहून केंद्रीय सुचीत समावेश करण्यास मंजुरी दिली आहे. यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील मुन्नुरू कापू समाजाने आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष हंसराज अहीर यांची निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा सन्मान करत आभार मानले.



महायुती सरकारने राज्यातील ओबीसी प्रवर्गातील काही जातींचा केंद्रीय सुचीमध्ये समावेश करण्यासाठी राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला शिफारस केली होती. त्या शिफारशीनुसार आयोगाने काही ओबीसी जातींना केंद्रीय सुचीत समावेश करण्यास मंजुरी दिली आहे. यामध्ये मुन्नुरू कापू समाजाचा समावेश झाल्याने समाजातील आनंद व्यक्त झाला.जिल्हाध्यक्ष संजय मिसलवार यांच्या नेतृत्वाखाली शंकर सिध्दाम, रमेश राउत, व्यैकटेश सुरा, गोपाल टोटा, रवि पुरेड्डीवार, डी. समैया, रमेश दिंडेवार, मोहन रासा, रमैया पुरेल्ली, तिरूपती पुरेल्ली, शंकर मिट्टा, श्रीनिवास रंगैरी, संपथ कडम, रवि कडम, नरसिंग मिट्टा, अशोक पुष्पाला, राकेश दिंडेवार आदींनी हंसराज अहीर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सन्मान केला.ंसराज अहीर यांनी मुन्नुरू कापू समाजाच्या हितासाठी नेहमीच योगदान दिल्याबद्दल समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी मनःपूर्वक आभार मानले.

# नवभारत विद्यालय मुल येथे भारतरत्न डॉ. ए. पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन व हात धुवा दिन म्हणून साजरी

**मूल । प्रतिनिधी**

नवभारत विद्यालय मुल येथे देशाचे माजी राष्ट्रपती आणि भारतरत्न, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

डॉ. कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. एच. झाडे, ज्येष्ठ शिक्षक गुरुदास चौधरी, वी. के. मेश्राम, पी. पी. उमक, डी. एस. गोंगल, वर्षा भांडारकर, एन. एस. माथनकर, बी. एच. सलाम, पी.



पी. वाळके आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांना सुरक्षा SOS - pp विषयी माहिती देण्यात आली. या ॲप्लिकेशनच्या मदतीने विद्यार्थ्यांना विविध सुरक्षेविषयी माहिती मिळवता येते. दिवसाच्या निमित्ताने हात धुवा दिन अंतर्गत निरोगी राहण्यासाठी विद्यार्थ्यांना हात कसे धुवायचे याचे प्रात्यक्षिक सौ. वर्षा भांडारकर मॅडम यांनी करून दाखविले. त्यांनी स्पष्ट केले की, हात स्वच्छ ठेवणे किती महत्त्वाचे आहे, विशेषतः जेव्हा आपण हाताने जेवण करतो. स्वच्छ हात असलेले लोकच आरोग्यदायी जीवन जगू शकतात, असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाच्या समारोपात सर्व विद्यार्थ्यांनी आपले हात स्वच्छ धुतले. या उपक्रमाला शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींचा मोठा प्रतिसाद मिळाला.

# भिसी येथील आश्रम शाळेची मान्यता रद्द विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे इतरत्र समायोजन

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील भिसी येथील शिवाणी माध्यमीक अनुदानीत आदिवासी आश्रम शाळेची मान्यता आदिवासी विकास आयुक्त, महाराष्ट्र राज्य नाशिक यांच्या आदेशाने रद्द करण्यात आली आहे. शाळेच्या मान्यता रद्द करण्यासाठी अनेक गंभीर कारणे दाखवण्यात आली आहेत, विशेषतः ही शाळा महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते व माजी मंत्री विजय वडेट्टीवार यांच्या सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळ गडचिरोली यांच्या माध्यमातून चालविण्यात येत होती.

इंदिरा प्रगती शिक्षण संस्था भिंडाळा, ता. नागभीड, जि. चंद्रपूर यांद्वारे चालविलेल्या रुई ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर येथील रद्द करण्यात आलेल्या अनुदानित आश्रम शाळेची मान्यता सेमाना विद्या व वनविकास




प्रशिक्षण मंडळ गडचिरोली यांना हस्तांतरित करण्यात आलेली आहे. सदर आश्रम शाळा भिसी, ता. चिमूर येथे २०१०-११ च्या शैक्षणिक वर्षापासून कार्यरत होती. प्रकल्प अधिकारी चिमूर यांनी १९ ऑगस्ट २०२३ रोजी शाळेची पाहणी केल्यावर गंभीर त्रुटी आढळल्या. त्यांनी या त्रुटींचा अहवाल अपर आयुक्त नागपूर यांना सादर केला. त्यावरून शाळेच्या गुणवत्तेची स्थिती चिंताजनक असल्याचे स्पष्ट झाले. शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी असून शिक्षणाच्या मूलभूत बाबींचा अभाव असल्याचे दिसून आले.या शाळेत फक्त ३९ विद्यार्थी उपस्थित होते, त्यापैकी ११ विद्यार्थी अनधिकृतपणे उपस्थित असल्याचे आढळले. विद्यार्थ्यांना वाचन, लेखन, आणि गणितीय मूलभूत क्रिया करता येत नव्हत्या, ज्यामुळे शाळेची गुणवत्ता अत्यंत ढासळली होती. शाळेतील अनेक सुविधांचा अभाव होता; शिक्षकांचे रेकॉर्ड अद्ययावत नव्हते, शाळेत दारु पिऊन येणारे कर्मचारी उपस्थित होते, आणि शालेय इमारत भाड्याच्या आहे.आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून आदिवासी विकास आयुक्त, महाराष्ट्र राज्य नाशिक यांनी या आश्रम शाळेची कायमस्वरूपी मान्यता रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, शाळेतील मान्यता प्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना इतर अनुदानित आश्रम शाळेत समायोजित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, असेही आदेश दिले आहेत.यामुळे, भिसी येथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून प्रकल्प अधिकारी चिमूर यांनी जवळच्या शासकीय,अनुदानित आश्रम शाळेत विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याचे निर्देश दिले आहेत.

# धाराशिव येथे आधारभूत सोयाबीन खरेदी केंद्राची सुरुवात



**धाराशिव । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सोयाबीनची किमान आधारभूत किंमत ४,८९२ रुपये प्रति क्विंटल निश्चित केली आहे. यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत व्हावी आणि बाजारभाव पडल्यास होणाऱ्या नुकसानीपासून संरक्षण मिळावे, यासाठी हमीभावाने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली होती.या अनुषंगाने नाफेड व महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाच्या अंतर्गत धाराशिव तालुका खरेदी विक्री संघ येथे आधारभूत सोयाबीन खरेदी केंद्राची सुरुवात करण्यात आली आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना या केंद्रामुळे मोठा दिलासा मिळणार असून, जास्तीत जास्त शेतकरी बांधवांना याचा लाभ होईल, अशी अपेक्षा आहे. यावेळी धाराशिव तालुका खरेदी विक्री संघाचे पदाधिकारी, नाफेड व पणन महासंघाचे अधिकारी आणि अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते.

# आमदार भरत गोगावले यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावीत संत रोहिदास गर्जना मंडळाचा शिवसेना शिंदे गटात जाहिर प्रवेश

**गोरेगांव। प्रतिनिधी**

कार्यसम्राट आमदार भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत गोरेगांवातील संत रोहिदास गर्जना मंडळाने शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला आहे. गोर-गरिबांचे कैवारी आणि दाता म्हणून ओळखले जाणारे आमदार भरत शेट गोगावले यांनी आपल्या कार्यप्रणालीद्वारे अनेक ठिकाणी कामाचा ठसा उमठवला आहे.



आमदार भरत गोगावले यांच्या कार्यप्रणालीवर प्रभावीत होऊन गोरेगांवातील संत रोहिदास गर्जना मंडळाने त्यांच्या पाठींब्याचा निश्चय केला होता. मात्र, योग जुळून येत नव्हता. १३ ऑक्टोबर २रोजी गोरेगांव विभाग प्रमुख दिनेश हरवंडकर यांच्या पुढाकाराने हा योग जुळून आला, आणि संत रोहिदास गर्जना (रजि.) मंडळाच्या परिवाराने एकमताने शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला.


या वेळी साक्षी प्रसाद गोरेगांवकर यांची महिला गोरेगांव शहर प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे, आणि लवकरच त्यांना नियुक्ती पत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीस आमदार भरतशेट यांचे महिलांकडून औक्षण करण्यात आले. मंडळाचे सल्लागार दिलीप गोरेगांवकर व मंगेश गोरेगांवकर यांनी शाल श्रीफळ देऊन स्वागत केले. कार्यक्रमानंतर आमदार भरत गोगावले यांनी गोरेगांवातील छत्रपती शिवरायांच्या पुतळयाचे नूतनीकरण आणि सुशोभिकरण करण्याचे आश्वासन दिले. यावेळी दक्षिण रायगड जिल्हा प्रमुख निलिमा घोसाळकर, रायगड जिल्हा युवासेना प्रमुख विपुल उभारे, माणगांव उपतालुका प्रमुख जगदीश दोशी, गोरेगांव विभाग प्रमुख दिनेश हरवंडकर, माणगांव महिला तालुका प्रमुख अरुणा वाघमारे, लोणेरे महिला विभाग प्रमुख अर्चना धसाडे, गोरेगांव उपशहर प्रमुख सज्जादभाई गोडमे, माणगांव तालुका सोशल मिडिया अध्यक्ष आदित्य गोरेगांवकर यांच्यासह इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संत रोहिदास गर्जना मंडळ हे एक परिवार असून, हे मंडळ गेली अनेक वर्षे परंपरा जपत प्रत्येक सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करीत आले आहे. नागपंचमीला बाल्या नृत्याचे नारळ फोडून गणेशोत्सवाची चाहुल लागल्याचे संकेत याच मंडळाकडून दिले जातात. आगामी नवरात्रौत्सवात मंडळाने आयोजित केलेल्या गरबा नृत्याचे आयोजन महिला व पुरुषांमध्ये एकत्रित करण्यात आले आहे, तर दसर्याच्या दिवशी एकमेकांना सोनं देऊन शुभेच्छा दिल्या जातात. दिवाळीला गोरेगांवातील छत्रपती शिवरायांच्या अर्धपुतळ्याभोवती रांगोळी काढून महिलांनी दिवे लावून महाराजांविषयी ऋण व्यक्त केले. संत रोहिदास गर्जना मंडळाच्या प्रत्येक सदस्याने सण उत्सव साजरे करण्यासाठी आणि परंपरा जपण्यासाठी नेहमीच अग्रहीत असतात.

# महाराष्ट्र शासनाचे महत्त्वाचे आदेश: वैजापूरमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची स्थापना

**छत्रपती संभाजी नगर । वैजापूर**

महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण आदेशानुसार वैजापूरमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या कार्यालयामुळे वैजापूर व परिसरातील नागरिकांच्या जीवनशैलीत क्रांतिकारक बदल होण्याची अपेक्षा आहे. एम एच-५७ नोंदणी क्रमांकाच्या सह उभारले जाणारे हे कार्यालय वाहन परवाने, नोंदणी आणि इतर सेवा अधिक सुलभ व जलद करणार आहे. या निर्णयामुळे नागरिकांना वाहन नोंदणीसाठी लांबच्या प्रवासाची गरज उरणार नाही. स्थानिक कार्यालयामुळे विविध प्रक्रिया जलद होतील, ज्यामुळे वेळ आणि श्रम या दोन्हीची बचत होईल. वाहनधारकांसाठी ही एक मोठी सुविधा ठरणार आहे.उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी आवश्यक पदांची निर्मिती करण्यात येणार आहे, तसेच शासकीय किंवा खाजगी जागा भाडीत घेण्याचे कामही सुरू आहे. याशिवाय कार्यालयासाठी एक




इंटरसेप्टर वाहन देखील मंजूर करण्यात आले आहे.स्थानिक नागरिकांनी याबाबत आपल्या समाधान व्यक्त केले आहे. हे कार्यालय आमच्यासाठी खूप मोठी सोय ठरणार आहे. वाहन परवाने व नोंदणीसाठी आता वेळेची आणि पैशाची बचत होईल, असे त्यांनी सांगितले. वैजापूरमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय उभारण्याचा हा निर्णय स्थानिक विकासाच्या दृष्टीने एक महत्वपूर्ण पाऊल ठरेल.

# हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील सिंधी रेल्वे येथे राष्ट्रवादी काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात भारतीय जनता पार्टीचा विस्तार दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात होत आहे. या संदर्भात, १४ ऑक्टोबर २०२४ रोजी सेलू तालुक्यातील सिंधी रेल्वे येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे असंख्य पुरुष व महिलांनी आमदार समीर कुणावार यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

सदर प्रवेश सोहळ्याचे आयोजन १५ ऑक्टोबर २०२४ रोजी आमदार समीर कुणावार यांच्या जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले. यावेळी आमदार समीर कुणावार यांच्या विकास कार्याचे आणि कार्यशैलीचे विशेष उल्लेख करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून राजू खाटकर, राजू बावनकर, शेखर वरुडकर,




मेघराज भिमेट, दशरथ पराते, आणि अनेक अन्य भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

या कार्यक्रमाला भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते, माजी नगरसेविका अजया अनिल साखळे, नरेंद्र सेलूकर, गणेश काळबांडे, अनिल साखळे, आणि इतर जेष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटातील असंख्य कार्यकर्त्यांना रीतसर भाजपामध्ये प्रवेश देण्यात आला, ज्यामुळे हिंगणघाट विधानसभा क्षेत्रात भाजपाचा प्रभाव आणखी वाढल्याचे दिसून आले

# मालाड मध्ये ओव्हरटेक करण्यावरून रिक्षाचालकाने आकाशची हत्या

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील मालाडमध्ये गेल्या शनिवारी रोड रेजची घटना घडली होती, ज्यामध्ये आकाश नावाच्या तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणी एक मोठा अपडेट समोर आला आहे.

काय प्रकरण आहे?

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १२ ऑक्टोबर रोजी घडली. या घटनेत मृत आकाश खण हा मालाड परिसरातील शिवाजी नगर चौकातून आपल्या कुटुंबासाठी नवीन कार बुक करून परतत होता. आकाश हा त्याच्या दुचाकीवरून तर त्याचे आई-वडील ऑटो रिक्षाने येत होते.

बाचाबाची झाल्यानंतर आकाशने तेथे उभ्या असलेल्या लोकांवर हल्ला केला ओव्हरटेक करण्यावरून रिक्षाचालक आणि आकाश यांच्यात बाचाबाची झाली,





त्यानंतर आजूबाजूचे लोक तेथे जमा झाले. आजूबाजूचे लोक भांडण सोडवण्याचा प्रयत्न करत होते पण आकाशने तिथे उभ्या असलेल्या काही लोकांवर अचानक हल्ला केला, त्यानंतर इतर लोकांनीही आकाशला बेदम मारहाण केली.

आकाशला मारहाण होत असल्याचे पाहून त्याच्या आई-वडिलांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला पण यादरम्यान संतप्त लोकांनी त्याच्या वडिलांनाही बेदम मारहाण केले आणि आई आपल्या मुलाला वाचवण्यासाठी त्याच्या अंगावर लोटून गेली तरी सुद्धा त्याला मारहाण करतच होते.पोलिस सूत्रांनी काय सांगितले?

या प्रकरणी पोलीस सूत्रांचे म्हणणे आहेकी, मारामारीदरम्यान आकाशचा मृत्यू होईल असे वाटत नव्हते मात्र त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि काही वेळाने डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या संपूर्ण प्रकरणामध्ये आकाशवर हल्ला करणाऱ्यांनाही गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी सध्या पोलिसांनी एकूण १० जणांना अटक केली आहे. अटक आरोपींवर भादंवि कलम १०३(१), ११५(२), ३५२, ३२४(४), १८९(२), १८९(४), १९०, १९१(२), ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या सर्व आरोपींना पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत. याप्रकरणी प्राथमिक तपासात आकाशला काही ऑटोचालकांनी मिळून मारहाण केल्याचे दिसून आले मात्र तसे नाही. ऑटोचालक अविनाश कदम आणि आकाश यांच्यात बाचाबाची झाली, इतर ऑटोचालक तेथून निघून गेले.

# विवेकानंद महाविद्यालयात आज पालक सभेचे आयोजन




**भद्रावती । प्रतिनिधी**

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयात पालक संघाच्यावतीने आज दिनांक १७/१०/२०२४ रोज गुरुवारला सकाळी १०.३० वाजता पालक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. महाविद्यालयातील महायोगी अरविंद सभागृहात होणाऱ्या या सभेत विवेकानंद (ज्ञानपीठ), कॉन्व्हेंट वरोरा चे उपाध्यक्ष जयंत टेमुर्डे, कोषाध्यक्ष अभिजीत बोथले, कर्मवीर कनिष्ठ महाविद्यालय घोडपेठचे प्राचार्य नरेश साळवे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव उमाटे यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या या पालक सभेत वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पालक संघातर्फे करण्यात आले आहे. या सभेत नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध स्कॉलरशिप योजनांसह अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे.

# वर्दळीच्या चौकात वाहने सुसाट, काँग्रेसचे पोलिसांना निवेदन



**सेलू । प्रतिनिधी**

सेलू तालुक्यातील यशवंत चौकात वाहतूक नियमांचे उल्लंघन होत असून, रोड रोमिओंच्या सुसाट गाड्या अपघाताची शक्यता वाढवत आहेत. याबाबत काँग्रेसचे अध्यक्ष दीपक बीसेन यांनी सेलू पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना निवेदन देऊन पोलिसांची उपस्थिती वाढवण्याची मागणी केली आहे.

सेलू शहरातील बस स्थानक, मेडिकल चौक व यशवंत चौक परिसरात शाळा व महाविद्यालये असल्यामुळे दररोज मोठी वर्दळ असते. शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळात विद्यार्थ्यांची गर्दी वाढते, परंतु त्याचवेळी रोड रोमिओंच्या वाहनांची धावपळ ही चिंतेचा विषय बनली आहे. बीसेन यांनी नमूद केले की, यशवंत चौकात होणाऱ्या अपघातांची संख्या वाढत आहे, त्यामुळे पोलिसांची उपस्थिती अत्यंत आवश्यक आहे.

निवेदनात त्यांनी स्पष्ट केले की, यशवंत चौकात शाळा सुरू होण्याच्या व सुटण्याच्या वेळात पोलिसांची नियुक्ती केली गेली तर अपघातांची संख्या कमी होईल आणि विद्यार्थ्यांची सुरक्षा सुनिश्चित होईल. यामुळे वर्दळीच्या चौकात सुरक्षितता वाढेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.स्थानीय जनतेने या मागणीला समर्थन देत, यावर त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# सुरेश सारडा यांचा भाजप प्रवेश; हदगाव हिमायतनगर मतदारसंघात नवचैतन्य

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव शहरातील प्रतिष्ठित आणि जनाधार असलेले नेते सुरेश सारडा यांनी नुकताच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. हा पक्षप्रवेश सोहळा मुंबईतील भाजप कार्यालयात प्रदेश महामंत्री संजय केणेकर यांच्या उपस्थितीत पार पडला. सारडा यांच्या प्रवेशामुळे नांदेड जिल्ह्यासह हदगाव-हिमायतनगर विधानसभेमध्ये भाजप पक्षाला मोठे बळ मिळाल्याचे सांगितले जात आहे.

सुरेश सारडा यांनी राजकीय जीवनाची सुरुवात हिंदुत्व विचारसरणीवर केली. त्यांनी हदगाव शहरातील शिवसेनेचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले, तसेच मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळली. मनसेचे हदगाव तालुका प्रमुख असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलने करून त्यांचे प्रश्न सोडवण्यात पुढाकार घेतला. त्यांचा व्यापक जनसंपर्क हा हदगाव आणि हिमायतनगर तालुक्यांत ओळखला जातो.

सारडा यांनी विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून हिंदू जनजागृती मोहीम राबवून समाजात नवचैतन्य निर्माण केले आहे. एक प्रखर वक्ता आणि कुशल संघटक म्हणून त्यांचा लौकिक असून, भाजपमध्ये प्रवेश केल्यामुळे पक्षाचे स्थान अधिक मजबूत होईल, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे.

भाजप प्रवेशाच्या वेळी सारडा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विचारांनी प्रेरित होऊन भाजपची निवड केल्याचे सांगितले. त्यांनी पक्षासाठी अहोरात्र काम करण्याची ग्वाही दिली. त्यांच्या प्रवेशामुळे विरोधकांमध्ये अस्वस्थता पसरल्याची चर्चा सध्या हदगाव-हिमायतनगर



मतदारसंघात सुरू आहे.

२०१४ मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून सारडा यांनी हदगाव-हिमायतनगर मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. तत्कालीन मोदी लाटेमध्येही त्यांनी जनाधाराच्या जोरावर कडवी लढत दिली. राजकीय दृष्टिकोनाने दूरदृष्टी असणारे आणि जनतेच्या प्रश्नांवर लढणारे नेते भाजपला मिळाल्याने मतदारसंघात भाजपची पकड अधिक मजबूत झाली असल्याचे बोलले जात आहे. सारडा यांच्या भाजप प्रवेशामुळे पक्षाला नवीन ऊर्जा मिळाल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अनुभव आणि प्रभावामुळे भाजपला आगामी निवडणुकांमध्ये लाभ होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# आ.सतीश चव्हाण यांचा महायुतीवर हल्लाबोल



**गंगापूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबरला मतमोजणी होईल. निवडणूक तयारीच्या काळात महायुतीत अंतर्गत वाद उफाळल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) आमदार सतीश चव्हाण यांनी पत्रक काढून महायुतीच्या कारभारावर टीका केली आहे.

चव्हाण यांनी आरोप केला की, अडीच वर्षांत महायुती सरकारने बहुजन समाजाच्या प्रश्नांवर कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. मराठा, धनगर, ओबीसी, आदिवासी आणि मुस्लिम आरक्षणाच्या मुद्द्यांवर सरकारने निराशा केली, असे त्यांनी म्हटले. त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर जातनिहाय जनगणनेबाबतही उदासीनता दाखवल्याचा आरोप केला. बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही जातनिहाय जनगणना करून आरक्षण मर्यादा वाढवता आली असती, पण सरकार सकारात्मक नाही, असे ते म्हणाले. देशाचे गृहमंत्री अमित शाह यांच्या पटेल आणि गुर्जर आंदोलन हाताळले तसे महाराष्ट्रातील आंदोलन हाताळू या विधानावरही चव्हाण यांनी आक्षेप घेतला आहे. या विधानामुळे मराठा समाजात संतापाची भावना आहे, असे त्यांनी नमूद केले. चव्हाण यांच्या या भूमिकेमुळे ते अपक्ष लढणार की शरद पवारांच्या गटात जाणार, याबाबत राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

# काँग्रेसने अपप्रचार करून दलितांची दिशाभूल केली–ना.रामदास आठवले

## ज्यांनी आमचा फायदा घेऊन स्वतःचे कर्ज फेडले त्यांचा हिशोब करणार-डॉ.सुजय विखे पाटील

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुल गांधी यांनी संविधान बदलण्याचा अपप्रचार करून लोकांची दिशाभूल केली. यामुळे महायुतीच्या निकालावर परिणाम झाला, पण आता त्यांचा खोटा प्रचार उघड झाला आहे. येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या विजयाचा सत्कार माझ्या हस्ते होईल, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. राहुरीत महायुतीच्या वतीने रामदास आठवले यांचा केंद्रीय मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात आठवले यांनी डॉ. सुजय विखे पाटील व माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले होते, तर व्यासपीठावर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, रिपब्लिकन पक्षाचे



ज्येष्ठ नेते श्रीकांत भालेराव, रिपाईचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात आदी मान्यवर उपस्थित होते. रामदास आठवले म्हणाले, देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान आहे. संविधान बदलणे अशक्य आहे आणि ते कधीही बदलले जाणार नाही.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी बोलताना काँग्रेसवर टीका करत म्हटले, ज्यांनी आमचा फायदा घेत स्वतःचे कर्ज फेडले, त्यांचा हिशोब मी पुढील सभेत घेईन. कर्डिले हे आमदार होतीलच आणि राहुरी नगरपरिषदेचा नगराध्यक्षही आपलाच होईल. शिवाजीराव कर्डिले यांनी आठवलेंच्या नेतृत्वाखाली २००९ साली आपल्या प्रचाराचा शुभारंभ झाल्याचे सांगत शेतकऱ्यांच्या पिकविम्याचा लाभ सर्वसामान्यांना मिळाल्याचे सांगितले. जिल्हा बँकेच्या माध्यमातून एक रुपया विमा भरून शेतकऱ्यांना मोठी भरपाई मिळाली आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास तालुका प्रमुख वेळा साळवे, सुनील कर्डिले, अक्षय तनपुरे, पप्पू बनसोडे, उदयसिंह पाटील, सुरेश बनकर, रवींद्र म्हसे, शहाजी दिघे, प्रदीप दिघे, नानासाहेब गागरे आणि महायुती व मित्रपक्षांचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांचे योगदान महत्त्वाचे जिल्हाधिकारी सालीमठ



**अहमदनगर । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक ही लोकशाही बळकट करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, आणि या प्रक्रियेत मतदारांचे योगदान अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ अनुषंगाने मतदार जनजागृतीसाठी अहिल्यानगर जिल्हा स्वीप समितीच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आराखडा मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र यांना नुकताच सादर करण्यात आला. या आराखड्यात मतदार शिक्षण, सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रमांचा समावेश आहे. या प्रसंगी जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, मतदान प्रक्रियेतील नाविन्यपूर्ण उपक्रम मतदारांना निर्भय व निरपेक्ष मतदानासाठी प्रोत्साहित करतील. महिला आणि नवमतदारांचा मतदानात जास्तीत जास्त सहभाग वाढवण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात येतील.

कार्यक्रमाला निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र कुमार पाटील, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी गजानन नकासकर, तहसीलदार शरद घोरपडे, डॉ. अमोल बागुल आणि स्वीप समितीचे सदस्य उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, स्वीप समन्वयक अधिकारी अशोक कडूस आणि भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या आराखड्यात मतदार जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचा समावेश आहे.

प्रमुख उपक्रमांमध्ये रॅली, शोभायात्रा, पथनाट्य, सेल्फी पॉइंट, विविध स्पर्धा, नवमतदार नोंदणी, तसेच दिव्यांग, तृतीयपंथी आणि वंचित घटकातील महिलांसाठी विशेष उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. ईव्हीएम व व्हीव्हीपॅटविषयी जनजागृती शिबिरे, मतदार शपथ व संकल्पपत्र उपक्रम, सायकल रॅली, तसेच जनजागृतीसाठी दृकश्राव्य माध्यमांद्वारे कार्यक्रमांची निर्मितीही करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी सालीमठ यांनी मतदारांच्या सहभागातून लोकशाही प्रक्रियेची गुणवत्ता वृद्धिंगत करण्याचा विश्वास व्यक्त केला.

# भारतातील प्रथम पथदर्शी सूक्ष्म सिंचन प्रकल्पाची यशस्वी ट्रायल

**आर्वी । प्रतिनिधी**

वर्धा नदीवरील निम्न वर्धा धरणाचा उपयोग करून आर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांना उपसा जलसिंचनाच्या माध्यमातून कोरडवाहू जमिनीला ओलिताखाली आणण्याचे महत्त्वाचे कार्य सुमित वानखेडे यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची पहिली यशस्वी ट्रायल नुकतीच पार पडली, ज्यामुळे भारतातील प्रथम पथदर्शी सूक्ष्म सिंचन प्रकल्पाचा उदय झाला आहे.

सुमित वानखेडे यांनी २६४.४७ कोटी रुपयांची पथदर्शी सूक्ष्म सिंचन योजना आर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी आणली आहे. या योजनेमुळे ४० गावांतील ८४०० हेक्टर जमिनीवर सिंचनाची सोय होणार आहे. निम्न वर्धा प्रकल्पाच्या जलाशयातून पाणी धनोडी येथील पंप गृहातून उचलून आर्वी



तालुक्यातील जमिनीत बंदिस्त नलिकांच्या माध्यमातून व सूक्ष्म सिंचनाद्वारे पुरवले जाणार आहे.

या योजनेत ७५ टक्के ठिबक प्रणाली आणि २५ टक्के तुषार सिंचनाचा समावेश आहे, ज्यामुळे पाण्याचा अधिक प्रभावी वापर होणार आहे. वानखेडे यांनी सांगितले की, आर्वी तालुक्यातील ४८ मौजांतील २५,००० एकर जमीन सिंचनाखाली येईल, आणि या प्रकल्पामुळे दुष्काळी किंवा कोरडवाहू असलेल्या भागांमध्ये शेतीला नवीन जीवन मिळेल.सुमित वानखेडे म्हणाले, संपूर्ण प्रकल्प जमीनीखालून एचडीपी पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा करत आहे, त्यामुळे अधिक जमिनीची आवश्यकता नाही. आर्वी विधानसभा क्षेत्रातील प्रत्येक मौजातील शेतकऱ्यांना सिंचनाखाली आणण्यासाठी कायमच प्रयत्नरत राहण्याचे आश्वासन त्यांनी दिले.यामुळे आर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांना जलसिंचनाच्या दृष्टीने एक नवीन आणि प्रभावी पर्याय उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे त्यांच्या उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा आहे.

# अमरावती जिल्ह्यात अनुदानित खतांचा काळाबाजार उघडकीस

**अमरावती । प्रतिनिधी**

अमरावती जिल्ह्यात अनुदानित खतांचा काळाबाजार सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर गुन्हेशाखा युनिट एकच्या पथकाने नांदगावपेठ परिसरात छापा टाकून तिघांना अटक केली आहे. अटक केलेल्यांमध्ये संजय रमेशचंद्र अग्रवाल (वय ५४, आर्वी, जि. वर्धा), अशोक धनराज रावलानी (वय ५४, रा. कृष्णानगर, अमरावती) आणि ट्रकचालक दिनेशकुमार छबराज यादव (वय ४५, रा. रमबीयालगंज, जौनपूर, उत्तरप्रदेश) यांचा समावेश आहे.

गुन्हेशाखा पथकाने त्यांच्या कडून एकूण १५ लाख २१ हजार ६०१ रुपयांचा खतसाठा, एमएच २७ बीक्यू ९७८६ क्रमांकाचा ट्रक, एक इलेक्ट्रिक शिलाई मशीन, वजनकाटा असा एकूण ३० लाख ४६ हजार ६०१ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कृषी अधिकारी प्रवीण विजय खर्चे यांच्या तक्रारीवरून रविवारी (ता. १३) नांदगावपेठ पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या तिघांनी वडगाव माहुरे शेतशिवारात निर्जनस्थळी १६ चाकांच्या ट्रकमधून खतांची पोती खाली उतरवून दुसऱ्या पोत्यात भरताना पोलिसांच्या लक्षात आले.गुन्हेशाखा युनिट एकच्या पोलिसांनी चौकशी दरम्यान एक पिवळ्या रंगाचे पोते, ज्यावर भारतीय जन उर्वरक परियोजना भारत युरिया असे लिहिलेले होते, उतरवताना आढळले. यातील खत पांढऱ्या रंगाच्या पोत्यात भरले जात होते, ज्यावर टेक्निकल ग्रेड युरिया फॉर इंडस्ट्रिअल यूज ओण्ली असे स्पष्टपणे नमूद केले होते. याचे वजन मशीनद्वारे करण्यात आले, परंतु संबंधितांकडे आवश्यक दस्तऐवज आढळले नाहीत.गोरखनाथ जाधव, पोलिस निरीक्षक, गुन्हेशाखा, अमरावती यांनी सांगितले की, अटकेतील संजय अग्रवाल याचे आर्वीत कृषी सेवा केंद्र आहे. त्याने हा माल जालना जिल्ह्यातील सिल्लोड आणि भारवाडी येथून ट्रकमध्ये नांदगावपेठपर्यंत आणल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक केलेल्यांना पोलिस कोठडीत ठेवण्यात आले असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

या प्रकारच्या काळाबाजारामुळे शेतकऱ्यांना अनुदानित खतांचा लाभ मिळत नसल्याने त्यांच्या उत्पादनावर गंभीर परिणाम होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने तपासणी करणेआवश्यकआहे.

# हादगाव तालुक्यात धार्मिक मिरवणुकीत तणाव; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**नांदेड । प्रतिनिधी**

हादगाव तालुक्यात १५ ऑक्टोबर २०२४ रोजी मुस्लिम समाजाच्या संदल मिरवणुकीदरम्यान तणाव निर्माण झाला. मिरवणूक मुल्ला गल्ली ते शहरभर नियोजित होती. शासनाच्या आदेशानुसार पोलिसांनी डीजे बंद करण्याचे आदेश दिले होते. मात्र, काही सहभागी लोकांनी हात वर करून घोषणाबाजी करत मिरवणूक महादेव मठाच्या दिशेने नेली. महादेव मठाजवळ पोलिसांनी पुन्हा डीजे बंद केला, पण काही अंतरावर डीजे वाजवण्यात आला. त्यामुळे पुन्हा घोषणाबाजी झाली आणि महादेव मंदिर मठाजवळ चप्पल फेकण्याचा प्रकार घडला, ज्यामुळे हिंदू समाजाच्या भावना दुखावल्या.

या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. पोलिसांनी सदरील घटनेत ३२ जणांना आरोपी म्हणून निष्पन्न केले असून इतर ५० लोकांचा शोध सुरू आहे. हादगाव पोलीस ठाण्याचे पीएसआय नंद यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना ही माहिती दिली.घटनेनंतर हिंदू समाजात असंतोष निर्माण झाला आहे, आणि पोलिसांवर त्यांच्या कार्यवाहीवरून नाराजी व्यक्त केली जात आहे. पोलिस प्रशासनाने मात्र परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगून पुढील कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे.

# दहेगाव येथे संविधानाच्या मूल्यांचा प्रचार करणारा विवेक विचार मंचाचा मेळावा

**नागपूर । प्रतिनिधी**

विवेक विचार मंचाच्या भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षा निमित्त आयोजित सामाजिक संवाद मेळावा २०२४ चा कार्यक्रम दहेगाव येथे १४ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून महेश पोहनेरकर (सचिव, विवेक विचार मंच, पुणे), ऍड. संदिप जाधव (संविधान अभ्यासक, मुंबई) आणि सुनील कीटकरू (प्रांत संयोजक, विदर्भ) उपस्थित होते.





कार्यक्रमाचे सूत्र संचालन हरीशजी इंदूरकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अभय मडके यांनी केले. मेळाव्यात उपस्थित मान्यवरांमध्ये अतुल शेंडे (प्रांत संयोजक, विवेक विचार मंच), राहुल मून (वर्धा जिल्हा संयोजक), मनीष मेश्राम (नागपूर जिल्हा संयोजक), तसेच विलास ठाकरे, चंद्रशेखर पानतावणे, सुरेंद्र शेंडे, रुपेश बागडे, दादाराव लांजेवार, सीता गजभिये, माया शंभलकर, भारती आठणकर, आशिष माटे, सुधाकर बागडे, राजेश कापसे आणि सुजित बागडे यांचा समावेश होता.

या कार्यक्रमात भारतीय संविधानाच्या महत्त्वाबद्दल सखोल विचारविमर्श करण्यात आला. प्रमुख वक्त्यांनी संविधानाच्या मूल्यांची जपणूक करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उपस्थितांनी समाजातील विविध मुद्द्यांवर चर्चा केली, ज्यामध्ये समता, न्याय आणि समाजातील सर्व वर्गांच्या हक्कांची जपणूक करण्याबाबत विचार मांडण्यात आले.

कार्यक्रमाच्या समारोपात उपस्थितांनी संविधानाच्या मूल्यांची जपणूक करण्याचा संकल्प घेतला, यामुळे नागरिकांमध्ये जागरूकता आणि सामूहिक बांधिलकी निर्माण करण्याचा उद्देश साधण्यात आला.

विवेक विचार मंचाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाने भारतीय संविधानाच्या महत्वाकांक्षी ध्येयांची पुनरावृत्ती केली, ज्यामुळे समाजाच्या सर्व स्तरांतील व्यक्तींमध्ये विचारांची देवाणघेवाण आणि सुसंवाद वाढवण्यात मदत झाली.

या प्रकारच्या उपक्रमांमुळे संविधानाबद्दल जागरूकता वाढवण्यास आणि त्याच्या मूल्यांचे पालन करण्यास प्रोत्साहन मिळते

# मित्रानेच केली मित्राची निर्घृण हत्या भिगवण शहर हादरले,अवघ्या काही तासांत आरोपीला ताब्यात

**भिगवण । प्रतिनिधी**

भिगवण येथील मदनवाडी गावात एका मित्राने आपल्या मित्राची निर्घृण हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ४५ वर्षीय विजयकुमार विठ्ठलराव काजळे याच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या करण्यात आली.

याबाबत भिगवण पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मौजे मदनवाडी गावातील माळरानावर विजयकुमार काजळे आणि त्याचा २० वर्षीय मित्र राज भगवान शिंदे रात्री एकत्र बसले होते. बसताना कोणत्या तरी कारणावरून त्यांच्यात वाद झाला. वादाने भांडणाचे स्वरूप धारण केले, ज्यामुळे राज शिंदे याने विजयकुमार काजळे




याच्या डोक्यात दगड टाकून त्याची हत्या केली.

मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी भिगवण येथील सरकारी दवाखान्यात नेण्यात आला आहे. सदर घटनेच्या गांभीर्याचे भिगवण पोलिसांनी लक्ष्यात घेत तपास सुरू केला. अवघ्या काही तासांत आरोपीला शोधून ताब्यात घेण्यात आले. हत्या गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून अधिक तपास भिगवण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# अजित सीड कंपनीमध्ये २४ वर्षांच्या तरुणाचा गळफास : नातेवाईकांकडून घातपाताचा संशय

**बिडकीन । आझाद शेख**

पैठण तालुक्यातील फारोळा एमआयडीसी मधील गट १०० मधील अजित सीड कंपनीतील कामगार वैभव युवराज पवार (रा. लिंबगांव, ता. पैठण, जि. छत्रपतीनगर) याने गळफास घेऊन आत्महत्या केली.



काही दिवसांपासून तो कंपनीत राहत होता. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी सात वाजता वैभव गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला.कंपनीला तीन दिवस सुट्टी असल्याने गळफास कधी घेतला हे अद्याप समजू शकले नाही. मयताचे नातेवाईक कंपनीत आल्यावर त्यांनी घातपात झाल्याचा संशय व्यक्त केला आणि संताप व्यक्त केला. यामुळे कंपनीमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती बिडकीन पोलिसांना मिळाल्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके, पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, सहाय्यक फौजदार सोमनाथ तांगडे, अशोक सोकटकर, महादेव निकाळजे, रावसाहेब राठोड यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त घटनास्थळी दाखल झाला. मृतदेह ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला, जिथे वैद्यकीय अधिकारी यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने, बीट जमादार दिलीप साळवे, आणि आप्पासाहेब माळी पुढील अधिक तपास करीत आहेत.

# करमाळा शहरासाठी पाणीपुरवठा आणि सीसीटीव्ही प्रकल्पासाठी निधी मंजूर-आ.संजय शिंदे यांचे आभार

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहरातील पाणीपुरवठा समस्या आणि शहर सुरक्षा उपायांसाठी आवश्यक निधी मंजूर करण्यात आला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष संजय घोलप यांच्या पाठपुराव्यानंतर आमदार संजय शिंदे यांनी पाणीपुरवठा प्रकल्पासाठी १ कोटी ४० लाख रुपये आणि सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी ३० लाख रुपये निधी मंजूर केला आहे.

करमाळा शहरातील नागरिक, विशेषतः महिलांना, मागील वर्षभर पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. उन्हाळ्यात नैसर्गिक टंचाईमुळे निर्माण झालेली अडचण उजनी धरण १०० टक्के भरल्यानंतरही प्रशासनाच्या हलगर्जीमुळे कायम राहिली. त्यामुळे कृत्रिम पाणीटंचाईमुळे नागरिक त्रस्त झाले होते. मनसेचे तालुकाध्यक्ष संजय घोलप यांनी वेळोवेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि आमदार संजयमामा शिंदे यांना पत्र पाठवून मोटर दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. तसेच पाण्यासाठी महिलांसह आंदोलन करत नगरपालिकेत निवेदनही सादर करण्यात आले होते. या मागण्यांवर तातडीने कार्यवाही करत आमदार संजयमामा शिंदे यांनी दहिगाव येथील पाणीपुरवठा प्रकल्पातील मोटर दुरुस्तीसाठी १ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर केला. धर्मवीर संभाजी राजे प्रतिष्ठान आणि व्यापारी मित्रांनी शहरातील प्रमुख चौक, बायपास, शाळा परिसरात ३०० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी केली होती. संजय बापू घोलप यांच्या पुढाकाराने ही मागणी आमदार शिंदे यांच्याकडे मांडण्यात आली. यावर तातडीने निर्णय घेत ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पाणीपुरवठा आणि सुरक्षा यांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर झाल्यामुळे करमाळा शहरातील नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. संजय बापू घोलप म्हणाले, इतक्या मोठ्या प्रमाणावर निधी करमाळ्यासाठी पहिल्यांदाच मंजूर झाला आहे. हे येणाऱ्या निवडणुकीत त्यांचे सकारात्मक फळ दिसून येईल. आमदार संजय शिंदे यांच्या कार्याची प्रशंसा करताना घोलप यांनी सांगितले, बोले तैसा चाले... त्याची वंदिले पाऊली. यामुळे करमाळा शहराच्या विकासकामांना आता वेग येईल, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.





## विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे-प्रदीप वाघ



**जव्हार । प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी केली जाते. या निमित्ताने मोखाडा पंचायत समितीचे उपसभापती प्रदीप वाघ यांनी खोडाळा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत वाचनाचा सराव केला. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने वाचन केले. प्रदीप वाघ म्हणाले, लहान मुलांना वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे. 'वाचल तरच वाचू' असे म्हणताना, डॉ. अब्दुल कलामांनी प्रचंड वाचनाने भारतीय शास्त्रज्ञ ते भारताचे राष्ट्रपती बनले आणि देशाला जागतिक पातळीवर महत्त्वाचे स्थान प्राप्त करून दिले. या कार्यक्रमास राजा ठोमरे, वेंखंडे , आणि उपसरपंच नंदकुमार वाघ उपस्थित होते.

## महाराष्ट्रभर राज ठाकरे यांच्या लाडक्या बहिणीची चर्चा

### संगीता चेंढवणकर यांचा राज ठाकरे कडून सत्कार

**बदलापूर । प्रतिनिधी**

बदलापूरमध्ये घडलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणात चिमुकलींना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या संगीता चेंदवणकर यांचा राज ठाकरे यांनी विशेष सत्कार केला. काही दिवसांपूर्वी बदलापूरमध्ये दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार झाला होता. या प्रकरणातील आरोपी मोकाट असल्यामुळे, मनसे महिला शहराध्यक्ष संगीता चेंदवणकर यांनी न्यायासाठी रस्त्यावर उतरून अन्यायाच्या विरोधात आवाज उठवला.



त्यांच्या पाठपुराव्यामुळे पोलिसांनी आरोपीला अटक केली आणि गुन्हा दाखल केला. या घटनेच्या विरोधात अनेक बदलापूरकर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात आले, ज्यात कठोर शिक्षेची मागणी केली गेली.

राज ठाकरे यांचा मुंबईत झालेल्या राज्यस्तरीय पदाधिकारी मेळाव्यात संगीता चेंदवणकर यांचा सत्कार करण्यात आला. भाषण करताना राज ठाकरे यांनी संगीता यांचे विशेष कौतुक केले आणि त्यांना स्टेजवर बोलावून सन्मानित केले. यामुळे संगीता चेंदवणकर भावनिक झाल्या आणि त्यांच्या डोळ्यात अश्रू येऊन गेले.संगीता चेंदवणकर यांनी यावेळी म्हटले, माझ्या १८ वर्षांच्या कामाचे मूल्य आज सिद्ध झाले आहे. मला काहीही मिळाले तरी चालेल. त्यांनी राज ठाकरे यांचे आभार मानले, परंतु याला स्वतःचा सत्कार मानले नाही, तर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांचा आणि बदलापूरकर जनतेचा सन्मान असल्याचे स्पष्ट केले.



## समाजसेवा विद्यालयात मतदान जनजागृती रॅली

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील समाज सेवा विद्यालयात मंगळवार, १५ ऑक्टोबर रोजी मतदान जनजागृती अभियान अंतर्गत गावातून रॅली काढण्यात आली. या रॅलीमुळे मतदानाचे महत्व आणि जनतेला मतदानाच्या प्रक्रियेबद्दल जागरूक करणे हा मुख्य उद्देश होता.

रॅलीमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद सोरते आणि सहायक शिक्षक उपस्थित होते. यासोबतच, विद्यालयातील सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक वृंद, आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. रॅलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी गावातील नागरिकांना मतदानाचे महत्व सांगितले आणि मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

## गोंड गोवारी जमातीचा मतदानावर बहिष्कार



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

गोंड गोवारी जमातीच्या मागण्यांकडे शासनाने ४० वर्षांपासून दुर्लक्ष केल्याने चिमूर व नागभीड तालुक्याच्या वतीने आगामी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा इशारा देण्यात आला आहे. सोमवारी, १४ ऑक्टोबर रोजी चिमूर येथील अप्पर जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

२६ जानेवारीपासून संघर्ष कृती समितीच्या माध्यमातून आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. याची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १० फेब्रुवारी रोजी समितीच्या शिष्टमंडळाची बैठक घेतली होती. त्या बैठकीत गोंड गोवारी जमातीच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी के. एल. वडणे समिती स्थापन करण्यात आली होती. परंतु, आज ९ महिने उलटूनही वडणे समितीचा सकारात्मक अहवाल शासनाकडे सादर झालेला नाही.

गोंड गोवारी जमातीचे मतदार गेल्या ७० वर्षांपासून मतदान करत आहेत. तथापि, शासनाने त्यांच्या मागण्या पूर्ण न केल्यामुळे गोंड गोवारी समाजाने निवडणूक बहिष्काराचा इशारा दिला आहे. चिमूर तालुक्यातील गुरूदास नेवारे, किशोर नेवारे, किरणदास सोनवाणे, महादेव लोहट, प्रकाश सहारे, प्रवीण वाघाडे, प्रभाकर राऊत आणि नागभीड तालुक्यातील राजेंद्र कोहरे, प्रदीप येसनसुरे, सुभाष गजभे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी निवेदनावर सह्या केल्या.

## औंढा नागनाथ येथे शेकडो युवकांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश



**औंढा नागनाथ । प्रतिनिधी**

काजीदरा तांडा येथील वार्ड क्र. २ मध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेना हिंगोली जिल्हाप्रमुख अजय ऊर्फ गोपु पाटील यांच्या नेतृत्वाखाली अनेक युवक व महिलांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात प्रवेश करण्यात आला.

या सोहळ्याला उपस्थित प्रमुख व्यक्तींच्या यादीत माजी आमदार डॉ. संतोष टारफे, जिल्हासंघटक बाळासाहेब मगर, उपजिल्हाप्रमुख जि.डी. काका मुळे, तालुकाप्रमुख गणेश देशमुख, उपतालुकाप्रमुख डॉ. चंद्रमुनी पाईकराव, अल्पसंख्याक तालुकाप्रमुख अलीम खतीब, सुनिल खंडागळे, शहरप्रमुख बिंदुमाधव कुलकर्णी, श्रावण चव्हाण, विष्णु जाधव, शेवाळा चेअरमन रूपेश सुर्यवंशी, इम्रान पठाण,लक्ष्मण भोने मधुकर गोरे, रवी डोंगरदिवे शिवाजी कऱ्हाळे, देविदास शिंदे, शेख साजिद, संतोष रेणके यांचा समावेश होता. या प्रवेश सोहळ्यात स्थानिक युवकांच्या एकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आणि सर्व उपस्थितांनी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती आणि धम्मचक्र परिवर्तन दिन साजरा

**वरोरा । प्रतिनिधी**

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उत्सव समिती आणि ऑल इंडिया कौमी तंजीम यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे ११वे राष्ट्रपती आणि जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. अवुल पकिर जैनुलाब्दीन अब्दुल कलाम यांची ९३वी जयंती आणि धम्मचक्र परिवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम चौकात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन शेख जैरूद्दीन छोटूभाई शेख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष विलास टिपले, डॉ. हेमंत खापणे, राजेंद्र चिकटे, प्रा. प्रवीण खेडकर, ओबीसी संघटनेचे श्याम लेंडे, मारुतीराव मगरे, रहमत बाबा, अनिल काळे, विलास परचाके, साहेबराव ठाकरे, सुनील गायकवाड, दशरथ शेंडे, गुलाब धबे, शेषराव भोई आणि रशीद शेख उपस्थित होते. - शेख जैरूद्दीन छोटूभाई शेख यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना सांगितले की, डॉ. कलाम हे भारतीय शास्त्रज्ञ होते. त्यांनी भारताच्या क्षेपणास्त्र आणि अण्वस्त्र कार्यक्रमांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. २००२ ते २००७ या काळात ते भारताचे राष्ट्रपती होते. त्यांच्या वैज्ञानिक कार्यामुळे आणि लोकप्रियतेमुळे त्यांना 'मिसाईल मॅन' आणि 'पीपल्स प्रेसिडेंट' अशी उपाधी मिळाली. डॉ. कलाम यांनी सर्वधर्मसमभाव आणि मानवतेची सेवा कशी करता येईल याचा नेहमी विचार केला. ते इतरांना प्रेरणा देत राहिले. त्यांचा जीवन प्रवास प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभास मान्यवरांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर पेपर विक्रेते, पत्रकार, विविध धर्मगुरू, पोलीस अधिकारी व अन्य कर्मचाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विशेषत: रहमत बाबांचा उल्लेखनीय योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले, तर आभार शेख जैरूद्दीन छोटूभाई शेख यांनी मानले. सायंकाळी आयोजित एक शाम डॉ. कलाम साहब के नाम या सांगीतिक कार्यक्रमाला गुरुदेव सेवा मंडळाचे अधिकारी लक्ष्मणराव गमे, विनोद खोब्रागडे, राजेंद्र मर्दाने, प्रदीप कोहपरे यांची उपस्थिती होती. धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात हजारो लोकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऑल इंडिया कौमी तंजीम व डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उत्सव समितीचे अध्यक्ष शेख जैरूद्दीन छोटूभाई शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

